


शाश्वत विकासासाठी युवा : पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास















SNUK

Where tireless striving stretches its arms towards perfection

# सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, अकोला.

# शब्दसुधा

वार्षिकांक २०२५ - २६

# शब्दसुधा

**२०२५-२६**

■ आमचे प्रेरणास्थान ■

मा. बी. पी. पवार

संस्थापक सचिव, सु. ना. कला, विज्ञान व उ. खे. वाणिज्य महाविद्यालय, अकोला.

■ मार्गदर्शक ■

**डॉ. नितीन पवार - अध्यक्ष**

**डॉ. जयंत बोबडे - उपाध्यक्ष**

■ संपादक ■

**डॉ. भास्कर पाटील, प्रा. नेमीचंद चव्हाण**

■ सह संपादक ■

**डॉ. अमोल मेश्राम, डॉ. नितीन देऊळकर**

■ संपादक मंडळ ■

**कु. आचल लंगोटे, अनिकेत डोंगरे, आनंद राठोड, कु. शितल दांडगे, कु. शिवाणी माने, कु. पुनम तांदळे, कु. कोमल बोदडे, रुषंग पवार, कु. गायत्री पद्मणे**

: प्रकाशक :

**प्राचार्य डॉ.अंबादास पांडे**

मुद्रक : योगिनी प्रिंटस् अकोला.

मुखपृष्ठ : हेमंत राठोड

(या अंकामध्ये प्रसिध्द झालेले लेखन हे त्या-त्या लेखकाचे, कवीचे असून संपादक मंडळ या लेखनास सहमत असेलच असे नाही. )

# ... शुभेच्छा संदेश ...

शामकी माता शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, उमरी (बु.) जि. वाशिम व्दारा संचालित असलेल्या अकोला स्थित सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयाचा 'शब्दसुधा' शीर्षकाचा वार्षिकांक ( **२०२५ - २६** ) प्रकाशित होत असल्यामुळे; मला शुभेच्छा देतांना फार आनंद होत आहे. प्राचार्य आणि संपादक मंडळाने महाविद्यालयीन तरुणांना आपले हक्काचे विचारपीठ 'शब्दसुधा' च्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याबद्दल अभिनंदन...... विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना लिहिते करण्याची प्रेरणा आणि स्फूर्ती या संपादकीय मंडळाने स्वीकारली. त्या माध्यमातून त्यांचे विचार, भाव-भावना व्यक्त करण्याची ही मोठी उपलब्धी या माध्यमाने यशस्वी होत आहे. या अंकामध्ये समाविष्ट झालेले लेखन चांगल्या प्रकारचे आहेच. तरीही मला असे वाटते की, पुढील अंकामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये घडलेले सुखद किंवा दुःखद अनुभव शब्दबध्द करावेत. सोबतच बोलीभाषेतील म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, लोकगीते, महापुरुषांचे प्रेरणादायी विचार यांचे संकलन -आकलन करुन, विद्यार्थ्यांनी आपली लेखन कौशल्यता वाढवावी. याच हेतूने आम्ही महाविद्यालयात स्वतंत्र अभ्यासिका उपलब्ध करुन दिली आहे, त्याचा जरुर लाभ घ्यावा.

मला आनंद आहे की या अंकामध्ये समकालीन प्रश्न मांडणारे लेखन यांचा समावेश झाला आहे. विद्यार्थ्यांनी सतत लिहित, वाचत राहिले पाहिजे. शेवटी जीवन काय आहे, याचा सार व्यक्त करणारा एक संदेश समाजमाध्यमावर फिरला, तो मला खूप भावला, तो आपण सर्वांना संदेश पुरक ठरेल, यासाठी आपल्यापुढे साभार व्यक्त करतो. जीवनातील सात सत्य - आरसा- खोटे बोलू देत नाही, सत्य- घाबरवू देत नाही, ज्ञान- मोहपाशामध्ये अडकवत नाही, विश्वास- कमकुवत होऊ देत नाही, प्रेम- व्देष करु देणार नाही, समाधान- दुःखी होऊ देणार नाही आणि कर्म- जीवनात अपयशी होऊ देणार नाही (साभार-गुगल प्ले स्टोअर) या सात सत्याचा स्वीकार करुन आपण आपले जीवन सफल करावे, जे इतरांनाही लाभदायक ठरणारे असेल. या सदिच्छांसह थांबतो.

**श्री. बी. पी. पवार**

(संस्थापक सचिव)

शामकी माता शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, उमरी (बु.) जि. वाशिम

# दोन शब्द : प्राचार्यांचे
# अभिनंदन .... आणि शुभेच्छाही

२०२५ - २६ या वर्षीचा आमच्या महाविद्यालयाचा 'शब्दसुधा' हा वार्षिकांक प्रकाशित होत असतांना मला अत्यंत आनंद होत आहे विद्यार्थ्यांना आपल्या मनातील विचार, त्यांचे सुप्त गुण यांचा विकास करण्यासाठी वार्षिकांक महत्त्वाचा दस्तऐवज असतो. यामुळे विद्यार्थ्यांना लिखाणाची आवड निर्माण होण्यास मदत हाते. महाविद्यालयाने 'शब्दसुधा' हा वार्षिकांक दरवर्षी प्रकाशित करुन, विद्यार्थ्यांना ही संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थी हा महाविद्यालयाचा केंद्रबिंदू असतो. विद्यार्थ्यांची प्रगती म्हणजे महाविद्यालयाची प्रगती असते, म्हणून त्यांचा व्यक्तिगत विकास व्हावा या करिता महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग व विविध अभ्यास मंडळांच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात.

महाविद्यालयाने विद्यार्थी केंद्रस्थान मानुन विविध कार्यक्रम राबविले. यात विविध कार्यक्रमाचा समावेश आहे, ज्याची नोंद या अंकातील वार्षिक अहवालातून दिसून येते. यात समाविष्ट लेख हे विद्यार्थ्यांची लेखन व आकलन क्षमता सिद्ध करणारे आहेत. त्यातून इतरही विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच त्यांचे विचार शब्दबध्द करण्याचे कार्य हा 'शब्दसुधा' अंक निश्चितच करीत आहे. विद्यार्थ्यांच्या लेखनास या अंकातून प्रसिद्ध करुन, त्यांना हक्काचे विचारपीठ आमच्या 'शब्दसुधा' वार्षिकांच्या संपादक मंडळाने उपलब्ध करुन दिलेले आहे. संपादक मंडळाने अतिशय मेहनतीने, आकर्षक आणि वाचनीय अंक संपादित करुन दिला, त्याबद्दल या अंकाचे संपादक डॉ. भास्कर पाटील, प्रा. नेमीचंद चव्हाण तसेच वार्षिकांक समिती सदस्य डॉ.अमोल मेश्राम, डॉ. नितीन देउळकार या सर्वांचे हार्दिक अभिनंदन करतो. या अंकाच्या पुढील वाटचालीस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

**प्राचार्य**
**डॉ.अंबादास पांडे**

# संपादकीय...

प्रिय रसिक वाचक मित्रांनो, आपल्या महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष **२०२५ - २६** चा 'शब्दसुधा' हा वार्षिकांक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्ता साधत असतांना विद्यार्थ्यांनी आपल्या अंतःकरणात दडलेल्या सुप्त गुणांना शब्दसुधाच्या माध्यमातून आविष्कृत केले आहे. शब्दसुधाचे संपादक या नात्याने आम्हाला खेद वाटतो की, दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचे वाचन आणि लेखन कौशल्याचे विस्मरण होत आहे, तरी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या वर्षीच्या अंकामध्ये जे साहित्य लेखन केले आहे ते उत्कृष्टच आहे.

महाविद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्ता साधत असतांना उत्तम गुणांची पदवी प्राप्त करणे हे प्रत्येक विद्यार्थ्यांचे ध्येय असायला हवे. त्यासोबतच कला, क्रीडा, साहित्य लेखन, ह्या क्षेत्रातील ज्ञान, आनंद मिळविण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. व्यक्तिमत्त्व विकासासाठी हे सर्व आवश्यक आहे. पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर, सामाजिक जीवनात वावरतांना, महाविद्यालयातील हा सर्वकश अनुभवच तुम्हाला एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणार आहे.

'शब्दसुधा' हा वार्षिकांक सुंदर आणि आकर्षक करण्यासाठी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव, श्री. बी. पी. पवार सर, मा. डॉ. नितीन पवार, डॉ. जयंत बोबडे, प्राचार्य डॉ.अंबादास पांडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संपादक मंडळातील सदस्य, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या उत्स्फूर्त व सक्रिय सहकार्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. या अंकात समाविष्ट सर्व कवी - लेखक व संकलक यांचे सहर्ष अभिनंदन.

हा अंक प्रसिद्ध करण्यासाठी संपादक मंडळावर प्राचार्यांनी जो विश्वास दाखविला, स्वातंत्र्य दिले, त्यामुळेच अंक अधिक सुबक करण्यास संपादकांना आनंद वाटला. त्यासाठी महाविद्यालयाचे व संस्थेचे संपादक मंडळाकडून आभार. या अंकास अधिक आकर्षक करण्यासाठी हेमंत विजय राठोड व उमेश राठोड यांनी छायाचित्र सजावट करुन दिली. तसेच योगिनी प्रिंट्सचे श्री गजानन वाघमारे यांनी अंक सुबक व दर्जेदार करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आभार व या अंकातील त्रुटीबद्दल क्षमस्व !

- संपादक मंडळ

## मेरी माटी मेरा देश

'' मेरी माटी मेरा देश अभियान '' भारत सरकार व्दारा प्रारंभ किया गया उपक्रम है, जो '' आजादी के अमृत महोत्सव '' के समापन कार्यक्रम के रुप में भारतीय स्वतंत्रता के ७५ वर्ष पुरे होने का उत्सव मनाने का एक बडा कदम है । इस कार्यक्रम का आयोजन ९ अगस्त से १५ अगस्त तक किया जाएगा । इसका मुख्य उद्देश भारतीय स्वतंत्रता संग्राम के दौरान वीर शहीदो स्वतंत्रता सेनानियों और वीरांगनाओ को सम्मान व श्रध्दांजली देना है । इस अभियांन का उद्देश्य वैसे वीर शहीदों का सम्मान करना भी है जो अब तक गुमनाम है और उनका स्वतंत्रता संग्राम में बहुत बडा योगदान रहा ।

'' मेरी माटी मेरा देश कार्यक्रम '' के तहत देश के विभिन्न हिस्सो से अमृत कलश यात्रा निकाली जाएगी जिसमें लाखों की संख्या में लोग शामिल होंग । इसके अंतर्गत ७५०० कलशों में मिट्टी एकत्र करके देश की राजधानी दिल्ली लाई जाएगी । इस मिट्टी का उपयोग दिल्ली में कर्तव्य पथ के किनारे '' अमृत वाटीका '' नामक एक उद्यान के निर्माण के लिए किया जाएगा । इस कलश में देश के अलग-अलग गांव की मिट्टी होगी इसी मिट्टी में पौधों का रोपण किया जाएगा । यह अमृत वाटीका देश की ताकत का प्रतिक बनेगा और राष्ट्र के समृध्दी को प्रतिष्ठित करेगा ।

'' मेरी माटी मेरा देश कार्यक्रम '' के अंतर्गत वसुधा बंधन कार्यक्रम के तहत प्रत्येक ग्रामपंचायत या गाँव में स्वदेशी प्रजातियो के ७५ पौधे लगाए जाएंगे । इसकी जिम्मेदारी राज्यो में ग्रामीण विकास और पंचायती राज विभाग को सौंपी जाएगी । इसके माध्यम से अभियान का प्रभाव साकार होगा और स्थानीय स्वदेशी वृक्षो का प्रोत्साहन किया जाएगा । यह पौधे उन्ही मिट्टी में लगाए जाएंगे जो देश के अलग-अलग क्षेत्रो से कलश यात्रा के दौरान लाए गए होंगे ।

'' मेरी माटी मेरा देश '' अभियान के तहत स्कुलो । में विभिन्न कार्यक्रम आयोजित किए जाएंगे । इसमें विद्यार्थीयो को वृक्षारोपण, लेखन, चित्रकला और कई सांस्कृतिक कार्यक्रमों में भाग लेने का मौका मिलेगा । इससे उनमें देशभक्ती और मातृभुमी के प्रति प्रेम की भावना को जागृत किया जाएगा । यह एक अभियान नारा है, जिसका उद्देश्य भारत के प्रत्येक नागरीक में अपने देश के प्रति देशभक्ती और अटुट प्रेम की भावना को स्थायी बनाना है । मेरी माटी मेरा देश अभियान के अंतर्गत गांव के क्षेत्रो में सार्वजनिक निकायों जैसे ब्लॉक, पंचायत बिल्डींग, स्कुल के आसपास स्थानीय वीरो को श्रध्दाजली देने के लिए एक शैल्पट का निर्माण किया जाएगा। इस स्थल पर स्वतंत्रता दिवस के दिन स्वतंत्रता सेनानियों एवं उनके परिवारो को सम्मानित करने के लिए वहां एकत्रित होकर ध्वजरोहण एवं राष्ट्रगान जैसे कार्यक्रम आयोजित किए जाएंगे। यह केवल गांव के क्षेत्रो में नहीं बाल्की शहरी क्षेत्रो में भी किया जाएगा ।

* देश के वीर शहीदों एवं स्वतंत्रता सेनानियों के सम्मान में इस कार्यक्रम का आयोजन किया जाएगा ।
* इस कार्यक्रम के अंतर्गत लोगों के भीतर देश भक्ती एवं भाईचारे की भावना का प्रचार प्रसार करनो है ।
* इस कार्यक्रम के अंतर्गत लोगों के भीतर देश भक्ती एवं देशभर में अलग-अलग क्षेत्रों में अमृत कलश यात्रा का अयोजन किया जाएगा ।
* इस कलश यात्रा में देश के कई क्षेत्रों से ७५०० कलशो में मिट्टी इकट्ठी करके देश की राजधानी दिल्ली में लाई जाएगी ।
* इस कलश में लाई गई मिट्टी में देश के कोने कोने से लाए गए विभीन्न प्रकार के पौधे लगाए जाएंगे ।
* इस कार्यक्रम के आगमन से देश के प्रधानमंत्री देश के प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी जी पंच प्रण के लिए शपथ लेंग । '' मेरी माटी मेरा देश अभिया '' शुरु करते समय नरेंद्र मोदी जी ने यह जानकारी दी थी की अगले २५ साल तक आजादी का अमृत महोत्सव मनाया जाएगा । इस समय के दौरान उन्होंने '' मेरी माटी मेरा देश '' अभियान के अंतर्गत पांच प्रण भी रखे थे । नीचे दिए गए हैं वे पांच प्रणः
* हमारे मन में बसी गुलामी की मंशा को जड से बाहर निकालना
* हमारे साथ मिलकर भारत को विकसीत देश बनाना ।
* देश की रक्षा करने वाले शहीद का सम्मान करना ।
* भारत देश को वर्ष २०४७ में विकसीत देश बनाने का सपना साकार करना और देश्या के नागरिको को अपने कर्तव्य को निभाकर देश की समृध्द विरासत पर गर्व करना ।
* हम सभी एकजुटता के लिए कर्तव्यनिष्ठा के पक्षधर है ।

'' मेरी माटी मेरा देश '' कार्यक्रम हमारे देश के विकास और समृध्दी के लिए एक महत्वपुर्ण पहल है । यह कार्यक्रम भारतीय समाज को अपने मुल्यो और संस्कृती के प्रति संवेदनशील बनाने का एक प्रयास है । और साथ ही देश की भुमी की संरक्षण एवं प्रदुषण मुक्त वातावरण को बनाए रखना का उद्देश्य रखता है । यह कार्यक्रम भारतीय नागरीको को उनके राष्ट्रभक्ती और देशप्रेम के प्रति समर्पित बनाने का एक जरुरी कदम है । यह कार्यक्रम विभिन्न स्तरो पर आयोजित किया जाता है और इसमें विभिन्न प्रकार के संगठन, स्कुल, कॉलेज, नागरीक समुह और सरकारी अधिकारीयों की भागीदारी होती है । इसके तहत विभिन्न संबोकधन कार्यशाल, सेमीनार, रैलीयां ओर पौधारोपण जैसे कई गतीविधीयों आयोजित की जाती है । '' मेरी माटी मेरा देश कार्यक्रम '' का कार्यक्रम का उद्देश्य हमें देश की समृध्दी संस्कृती के साथ जुडने के लिए प्रोत्साहीत करना है । हमारी मातृभुमी भारत विविधता और समृध्दी का प्रतिक है और हमें इसे संरक्षीत रखना है और उसके विभिन्न संस्कृतीयो और भाषाओं का सम्मान करना है । इसके साथ ही हमें अपने देश के प्राकृतीक संसाधनो के प्रति संवेदनशील होकर उन्हे संरक्षीत रखने की जिम्मेदारी भी समझनी चाहिए । प्रदुषण के समस्योओ का सामना करने के लिए हमें सक्रिय रुप से भागीदारी लेनी चाहीए और शुध्द वायु और पानी के लिए संबंधीत प्राकृतीक संसाधनो की

रक्षा करनी चाहीए । समस्त इस कार्यक्रम के माध्यम से हम अपने देश की महान बनाने का संकल्प लेते है और एक सशक्त समृध्द और प्रगतीशील भारत का निर्माण करने के लिए सक्रिय रुप से योगदान करते है । '' मेरी माटी मेरा देश '' कार्यक्रम हमें भारतीय संस्कृती के प्रती गर्व और सम्मान का अनुभव कराता है और हमें देशहित में सक्रिय रहने के लिए प्रेरित करता है ।

**कु.सोनम लबडे**
**बी. ए. भाग - २**

## नमन

प्रथम नमन त्या मातेला
जिने जन्म दिला महामानवाला
व्दितीय नमन त्या महामानवाला
ज्याने घडवीले संविधानाला
बाबासाहेब तुमचे कार्य इतके महान
तुमच्या प्रशंसेसाठी शब्द लहान
वंदन करितो मी तुम्हा शिल्पकाराला
ज्याने जाणिले दलितांच्या दुःखाला
शिक्षणाचे महत्त्व पटवुन दिले तुम्ही
तुमच्या या उपकाराचे सदैव ॠुणी आम्ही
वाचाल तर वाचाल हा संदेश तुमचा
तुमच्या कार्याला सलाम आहे आमचा
आज आपल्या देशात संविधान लागू झाले
तरीही देशाची विकासाची अंधारात पाऊले
पुन्हा अवतरा तुम्ही, कारण देश बघतोय वाट
तुमच्या मुळेच उगवणार एक सोनेरी पहाट

**आनंद हरिचंद राठोड**
**बी.ए.अतिम वर्ष**

## अभिमान

गगन में उड चुका है चंद्रयाण ।
मोदी जी ने शुरु किया है ।
मेरी माटी मेरा देश का अभियान ।।
विर सेनानीयोंने देके अपने प्राण ।
भारत कों दिया है जीवन दान ।।
आपकी शुरता की वजह सें बडा है
भारत का सम्मान।
हम सबको हमेश रहेगा आपका अभिमान ।।

**राजवी तायडे**
**बी. ए.भाग - ३**

## माझ्या गावात....

माझ्या गावात....
मंदिरेही होती आणि शाळाही
आता शाळा ओस पडताहेत
आणि मंदिरे झगमगाडात
त्यांच्या संवर्धनासाठी भरपूर निधीही दिला जातोय...
शाळा आणि शिक्षकांना मात्र जबरी कार्याची गुंतवणूक
ही क्रिया केव्हापासून सुरू झाली..?
मी वर्ष सांगत नाही...
२०१४.....की आणखी कोणते ?
तुम्हीच ठरवा....
ही सगळी क्रिया
आंधळया भक्त नि धर्मांधानी तपासून घ्यावी एव्हढेच...!
पुढच्या पिढ्या शिक्षणाअभावी बरबाद होताहेत
यासाठी ही तळमळ..

**भास्कर पाटील**

## काळाच्या पडद्याआडचे पाषाणशिल्पः प्राचीन भारतीय स्थापत्यकलेचा वारसा

भारताचा इतिहास केवळ युध्दांच्या कथांनी किंवा राजवटीच्या बदलांनी बनलेला नाही, तर तो इथल्या दगडधोंड्यात कोरलेल्या कलेनेही जमलेला आहे. आजच्या आधुनीक युगात जिथे कॉंक्रीटच्या इमारतीचे आयुष्य जेमतेम ५०-१०० वर्षे असते, तिथे हजारो वर्षापासुन ऊन, वारा आणि पाऊस झेलत ताठ मानेने उभी असलेली आपली प्राचीन मंदीरे, लेणी आणि किल्ले केवळ नसुन आपल्या पुर्वजाच्या प्रगत विज्ञानाचे जिवंत पुरावे आहेत.

**शुन्य तंत्रज्ञानातील भव्यता :- .**

आज आपल्याकडे अवाढव्य क्रेन, संगणकीय नकाशे (CAD) आणि प्रगत मशिन्स आहेत. मात्र प्राचीन काळात जेव्हा वीज नव्हती की लोखंडाचा आजच्या सारखा वापर नव्हता, तेव्हा कैलास लेणी (वेरुळ) सारखी वास्तू कशी उभी राहीली असेल ? वरुन खाली एकाच अखंड पाषाणात कोरलेले हे मंदीर म्हणजे वास्तुकलेचा चमत्कारच आहे. हे केवळ प्रदर्शन नसुन रॉक-कट आर्किटेक्चर मधील भूमिती आणि गणिताचा सर्वोच्च अविष्कार आहे.

**निसर्ग आणि विज्ञानाचा मेळ :-**

प्राचीन स्थापत्यकलेचे सर्वात मोठे वैशिष्ट्ये म्हणजे तिचा पर्यावरणाशी असलेला समतोल. दक्षिण भारतातील तंजावरचे बृहदेश्वर मंदिर असो किंवा महाराष्ट्रातील किल्ले या रचनामध्ये नैसर्गिक प्रकाश, हवा खेळती राहण्याची व्यवस्था आणि जलव्यवस्थापन यावर दिलेला भर थक्क करणारा आहे. रायगडावर आजही पावसाचे पाणी साठवण्याची जी व्यवस्था दिसते ती आधुनिक वॉटर हार्वेस्टिंगला लाजवणारी आहे.

**आजची गरजः संवर्धन की केवळ पर्यटन ? :-**

दुर्देवाने आज आपण या वारशाकडे केवळ पर्यटन स्थळ म्हणुन पाहतो अनेक प्राचीन वास्तुंच्या भिंतीवर नावे कोरणे, कचरा करणे किंवा अनधिकृत बांधकामे करणे यामुळे या अमूल्य ठेव्याचे नुकसान होत आहे. पुरातत्व विभागाचे प्रयत्न महत्वाचे आहेतच पण नागरीक म्हणुन आपण या वास्तुकडे आपलेपणाचे पाहणे आवश्यक आहे.प्राचिन स्थापत्यकला ही केवळ दगड आणि चुन्याची मांडणी नाही तर ती एका प्रगत संस्कृतीची ओळख आहे. जेव्हा आपण हंपीधील दगडी रथ पाहतो किंवा अजिठ्यातील रंगकामाला देतो, तेव्हा आपल्याला आपल्या इतिहासाचा सार्थ अभिमान वाटतो, हा वारसा पुढील पिढ्यांपर्यत पोहोचवण्यासाठी आपल्याला केवळ त्या वास्तुंचे जतन करुन चालणार नाही, तर त्यामागील अभियांत्रिकी आणि दृष्टी आत्मसात करावी लागेल.

**कु.शिवाणी माने**

**बी.ए.भाग -२**

## आधुनिक भारतः तंत्रज्ञान आणि परंपरेचा अनोखा संगम

२०२६ च्या उंबरठ्यावर उभा असलेला भारत आज एका अशा वळणावर आहे, जिथे एकीकडे आर्टिफिशीयल इंटेलिजन्स (AI) आणि फाइव्ह-जी (5G) क्रांती आहे तर दुसरीकडे हजारो वर्षापासुन चालत आलेल्या परंपरांची पाळेमुळे आहेत. आधुनिक भारताचे सांस्कृतिक जीवन हे आज स्क्रीन आणि संस्कृती यांच्यातील एक सुंदर संतुलन बनले आहे.

**डिजिटल युगातील सण आणि उत्सव :**

आज आपले सण केवळ घरापुरते मर्यादीत राहिलेले नाहित तर ते जागतिक स्तरावर डिजिटल झाले आहेत. दिवाळी असो व गणेशोत्सव, सोशल मीडियामुळे हे सण साजरे करण्याची पध्दत बदलली आहे. इन्स्टाग्राम रिल्स आणि लाईव्ह स्ट्रीमिंगमुळे संस्कृतीचा प्रसार वेगाने होत आहे.मात्र या झगमगाटतही मातीचा सुगंध आणि पारंपारीक गाणी आजही टिकुन आहेत. तंत्रज्ञानाने अंतर कमी केले आहे. ज्यामुळे सातासमुद्रापार असलेला भारतीय देखील आपल्या कुटुंबासह व्हर्च्युअली आरतीत सहभागी होऊ शकतो.

लोकल आता ग्लोबल आधुनिक भारतीयांची ओळख आता केवळ पाश्चात्य आनुकरणात राहिलेली नाही. आजचा तरुण पिझ्झा आणि पास्तासोबतच तितक्याच आवडीने मिलेट्स (भरड धान्य) आणि प्रादेशिक खाद्यपदार्थाकडे वळला आहे. पेहरावाच्या बाबतीतही फ्युजनचा कल वाढला आहे. साडी किंवा कुर्ता आता केवळ सणापुरता मर्यादित नसुन तो एका जागतीक फॅशन स्टेटमेंटचा भाग बनला आहे. आपली पारंपरिक कला आणि हस्तकला आता ई-कॉमर्सच्या माध्यमातुन जागतिक बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करत आहेत.कुटुंब व्यवस्था आणि बदलती सामाजिक मूल्ये शहरीकरणामुळे एकत्र कुटुंब पध्दती मागे पडली असली तरी डिजिटल कनेक्टिव्हिटी मुळे भावनिक नाते आजही टिकुन आहे. आधुनिक भारतात स्त्री-पुरुष समानतेचा विचार केवळ पुस्तकात न राहता प्रत्यक्षात येत आहे. कामाच्या ठिकाणी आणि घरातील जबाबदारीत बदलणारी ही सांस्कृतिक मुल्ये एका नव्या आणि प्रगल्भ भारताची ओळख करुन देतात.

अर्थात या प्रगतीसोबत काही आव्हानेही आहेत. स्मार्टफोनच्या अतिवापरामुळे प्रत्यक्ष भेटीगाठी आणी संवाद कमी होत चालला आहे का ? पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाखाली आपण आपली मुळ भाषा आणि लोककला विसरत आहोत का ? हे प्रश्न आजही उभे आहेत. २०२६ चा आधुनिक भारत हा रिॲलिटी आणि व्हर्च्युअल यांच्यातील सुवर्णमध्य साधणारा देश आहे. आपण मंगळावर पोहोचलो आहोत आणि त्याच वेळी आपण वडाच्या झाडाची पूजाही करतो. हेच कॉन्ट्रास्ट (विरोधभास) आपल्या संस्कृतीचे सौदर्य आहे. आधुनिकता म्हणजे परंपरेचा त्याग नव्हे, तर परंपरेला नव्या स्वरुपात स्वीकारणे होय. आणि भारत आज हेच अत्यंत अभिमानाने जगाला दाखवुन देत आहे.

**आनंद राठोड**

**बी.ए. भाग - ३**

## भारतीय अर्थव्यवस्थेचा आढावा (२०२४ ते २०२६)

**विकास आणि स्थिरता :-** वित्तीय आरोग्यातील सुधारणा परकीय चलन क्षेत्रातील संतुलन आणि नियंत्रणात आलेली महागाई यांच्या पाठबळामुळे भारतीय अर्थव्यवस्था मजबुत आणि स्थिर विकास अनुभवत आहे.

**विकासाची उद्दिष्ट्ये :-** भारताची मध्यम मुदतीची विकास क्षमता ७% पर्यंत मजबुत झाली असुन २०२६ मध्ये जीडीपी ४.५०% ट्रिलियम डॉलर्स (नाममात्र) पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

**महागाईचे कल :-** किरकोळ महागाईचा मुख्य दर आर्थिक वर्ष २०२४ मधील ५.४ % वरुन एप्रिल-डिसेंबर २०२४ मध्ये ४.९% पर्यंत कमी झाली असुन आर्थिक वर्ष २०२६ पर्यंत ते ४% च्या लक्ष्याशी जुळण्याची अपेक्षा आहे.

**मुलभूत आर्थिक संकल्पना :-** अर्थशास्त्र हे दुर्मिळता पुरवठा आणि मागणी, सिमात खर्च लाभ आणि प्रोत्साहन यावर आधारीत आहे.

**मुलभुत क्रिया :-** उत्पादन, वितरण, उपभोग आणि संसाधन व्यवस्थापन या चार मुलभुत आर्थिक क्रिया आहेत.

**आर्थिक क्षेत्रे :-** प्राथमिक - शेती, खाणकाम, वनीकरण, मासेमारी
दुय्यम - उत्पादन आणि प्रक्रिया
तृतीय - सेवा

**अर्थव्यवस्थेचे प्रकार :-** बाजार अर्थव्यवस्था, आदेशात्मक अर्थव्यवस्था, पांरपरीक अर्थव्यवस्था आणि मिश्र अर्थव्यवस्था

### स्थुल आर्थिक निर्देशक आणि धोरणे

**आर्थिक वाढ :-** बहुतेकदा सकल देशातर्गत उत्पादनव्दारे मोजली जाते ज्यामध्ये खाजगी उपयोग सरकारी खर्च गुंतवणूक आणि निव्वळ निर्यात याचा समावेश असतो.

**मौद्रिक धोरण :-** आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मध्यवर्ती बँकाव्दारे (जसे की फेड किंवा आरबीआय) वापरल्या जाणा-या रणनीती आणि कृती ज्यामध्ये अनेकदा व्याजदरातील बदलाचा समावेश असतो.

**निर्देशक :-** प्रमुख निर्देशकामध्ये जीडीपी वाढ चलनवाढ (सीपीआय) बेरोजगारीचे दर आणि खरेदी व्यवस्थापक निर्देशांक पीएमआय यांचा समावेश आहे.

**धोरणात्मक लक्ष :-** सार्वजनिक क्षेत्रातील सुधारणा पायाभुत सुविधाचा विकास कृषी सुधारणा आणि कामगार नियमन या प्रमुख क्षेत्रावर वारंवार लक्ष केंद्रीत केले जाते.

**जागतिक आर्थिक संदर्भ :-**

**पुनप्राप्ती आणि विषमता :-** महामारीतुन झालेली जागतीक आर्थिक पुनप्राप्ती असमान राहिली आहे ज्यामध्ये अनेक उदयोन्मुख बाजारपेठा आणि विकसनशील अर्थव्यवस्थांच्या तुलनेत प्रगत अर्थव्यवस्था अधिक जोमाने सावरल्या आहेत.

**महागाई नियंत्रण :-** प्रतिबधात्मक मौद्रिक धोरणामुळे जागतिक महागाई २०२२ मधील उच्चांकावरुन कमी झाली असून २०२५ मध्ये त्यात आणखी घट होण्याचा अंदाज आहे

**कु.रिना किशोर नहाटे**
बी.ए.भाग - २

## India's Economy : A Journey Towards Global Power

Economy is not just about money it is about pepole Progress and Possibilites आजच्या वेगवान जगात अर्थव्यवस्था ही केवळ जी.डी.पी.किंवा आकड्यांपुरती मर्यादित नसुन ती देशाच्या विकासाची खरी ओळख बनली आहे. भारत एक विकसनशील देश म्हणून जागतीक अर्थव्यवस्थेत आपले स्थान मजबुत करण्याच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे.

**1. Growth Story of India**

भारत सध्या जगातील सर्वात वेगाने वाढणा-या अर्थव्यवस्थापैकी एक आहे IT Sector सेवा क्षेत्र आणि उद्योग यांच्या मदतीने जे.डी.पी.मध्ये सातत्याने वाढ होत आहे.

**2. Rise of Digital Economy**

Digital India यामध्ये Initiative मुळे UPI Online banking यामध्ये क्रांती झाली आहे. ही खरी आर्थिक Digital transactions करत आहे. ही खरी आर्थिक क्रांती आहे.

**3. Challenges Ahed**

प्रगती सोबत काही आव्हाने देखील आहेत.

बेरोजगारी (Unemployment)

महागाई (Infdation)

ग्रामीण - शहरी दरी (Urban - Rural)

**4. Opportunities For Future**

भारतासाठी पुढील क्षेत्रे खुप महत्वाची ठरु शकतात

Green Energy
Startups & Innovetion
Export Growth
Skill Development
Youth is the real engine of India economy

भारताची अर्थव्यवस्था आज एक महत्वाच्या वळणावर उभी आहे. योग्य धोरणे तंत्रज्ञानाचा वापर आणि तरुणाची उर्जा यामुळे भारत भविष्यात आर्थिक महसत्ता बनु शकतो.

Srtong economy build Strong nation

**विरेंद्र धनराज खिराळे**
बी.ए.भाग - २

# नवीन अर्थसंकल्प

**प्रस्तावना :-** भारतात दरवर्षी केंद्र सरकाराकडून सादर केला जाणारा अर्थसंकल्प हा देशााच्या आर्थिक विकासाचा आराखडा मानला जातो नवीन अर्थसंकल्प मध्ये सरकार पुढील वर्षासाठी उत्पन्न व खर्चाचे नियोजन करते, तसेच विविध क्षेत्रासाठी धोरणात्मक निर्णय जाहीर करते त्यामुळे अर्थसंकल्पाचा परिणाम सामान्य नागरीकापासून उद्योग, शेती, आरोग्य इत्यादी सर्व क्षेत्रावर होतो.

**अर्थसंकल्प म्हणजे काय ? :-**

अर्थसंकल्प म्हणजे सरकाराचा एका आर्थिक वर्षासाठीचा आवक-जावकचा तपशील होय यात सरकार किती उत्पन्न मिळवणार आणि कोणत्या क्षेत्रावर किती खर्च करणार याची माहिती दिलेली असते.

**नवीन अर्थसंकल्पाची मुख्य उद्दिष्टे :-**

१. आर्थिक विकासाला चालना देणे.
२. रोजगारनिर्मिती वाढवणे.
३. गरीबी कमी करणे
४. शेती व उद्योग क्षेत्राचा विकास करणे.
५. सामाजिक कल्याण योजना राबवणे.

खालीलप्रमाणे नवीन अर्थसंल्पाची मुख्य उद्दिष्टे यांचे स्पष्टिकरण दिले आहे.

**१. आर्थिक विकासाला चालना देणे**

सरकार विविध क्षेत्रामध्ये (उद्योग, शेती, सेवा) गुंतवणूक वाढवते ज्यामुळे देशाची एकूण उत्पादनक्षमता वाढते नवीन प्रकल्प पायाभुत सुविधा (रस्ते, रेल्वे) यामुळे अर्थव्यवस्था मजबूत होते देश प्रगतीच्या मार्गावर जातो.

**२. रोजगार निर्मिती वाढवणे :-**

नवीन उद्योग स्टार्टअप्स आणि सरकारी योजनामुळे रोजगाराच्या संधी वाढवतात. विशेषतः तरुणासाठी नोकरीच्या नवीन संधी निर्माण होतात. ज्यामुळे बेरोजगारी कमी होण्यास मदत होते.

**३. गरीबी कमी करणे :-**

सरकार गरीब व गरजु लोकासाठी विविध योजना राबवते जसे की अनुदाने मोफत किंवा स्वस्त, धान्य घरकुल योजना इत्यादी त्यामुळे त्यांचा जिवनमान सुधारते आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होते.

**४. शेती व उद्योग क्षेत्राचा विकास करणे :-**

शेतक-यासाठी कर्जमाफी, अनुदाने, आधुनिक तंत्रज्ञान यांचा वापर वाढवण्यावर भर दिला जातो तसेच उद्योगाना प्रोत्साहन देण्यासाठी करसवलती व निधी दिला जातो. ज्यामुळे उत्पादन व निर्याद वाढते.

**५. सामजिक कल्याण योजना राबवणे :-**

शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण, वृध्दासाठी योजना यावर सरकार भर देते यामुळे समाजातील सर्व घटकाचा समतोल विकास होतो आणि सर्वांना मूलभूत सुविधा उपलब्ध होतात.

**नवीन अर्थसंकल्पातील महत्वाचे मुद्दे :-**

१. कर प्रणालीत बदल
- काही वस्तुवर कर कमी किंवा जास्त केला जातो.
- मध्यमवर्गीय नागरीकांना करसवलती देण्याची प्रयत्न

**२. शेती क्षेत्रासाठी योजना :-**
- शेतक-यांसाठी अनुदाने व कर्जसवलती
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्या वर भर

**३. शिक्षण व आरोग्य**
- शेतक-यासाठी अनुदाने व कर्जसवलती
- रुग्णालये व आरोग्यसेवा सुधारण्यासाठी योजना

**४. पायाभुत सुविधा :-**
- रस्ते, रेल्वे, विमानतळ विकास
- स्मार्ट सिटी प्रकल्पाना गती

**५. उद्योग व स्टार्टअप्स**
- नवीन उद्योगाना प्रोत्साहन
- स्टार्टअप्ससाठी करसवलती व निधी

**नवीन अर्थसंकल्पाचे फायदे**

देशाचे विकासाला गती मिळते.
रोजगाराच्या संधी वाढतात.
नागरिकाच्या जिवनमानात सुधारणा होते.
उद्योग व व्यापार वाढतो.

**काही आव्हाने :-**

सर्वांना समान लाभ मिळणे कठीण
महागाईवर नियंत्रण ठेवणे
ग्रामीण व शहरी विकासातील अंतर कमी करणे

**निष्कर्ष :-**

नवीन अर्थसंकल्प हा देशाच्या प्रगतीचा महत्वाचा आधांर आहे. योग्य नियोजन व अंमलबजावणी केल्यास तो देशाच्या सर्वांगीण विकासाठी उपयुक्त ठरतो सरकाराने जनतेच्या गरजा लक्षात घेऊन तयार केले अर्थसंकल्प नागरिकाच्या जिवनात सरकारत्मक बदल घडवु शकतो.

**अभिषेक विनोद आठवले**
बी.ए.भाग - ३

## ✼ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार ✼

डॉ बाबासाहेब आंबेडकराचे ' दि प्रॉब्लेम ऑफ रुपी ' हे पुस्तक पुस्तक प्रकाशित झाले. १९२३ साली लंडमध्ये तेव्हा ते केवळ ३२ वर्षाचे होते. त्यांच्या आयुषातली पहिली डॉक्टरेट ते लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स मधुन मिळवत होते त्यावेळचा हा त्यांच्या प्रबध होता. पण या प्रबधान भारतीय अर्थविश्वात आणी त्याची सगळी सुत्र हाती असलेल्या ब्रिटीश अर्थव्यवस्थेचा डोलारा गेलेल्या निर्णयात आज भारतीय अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळणारी संस्था उभी राहीली ती म्हणजे '' रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया '' होय.

कायदेतंज्ञ बाबासाहेबाची घटनाकार म्हणुन असलेली ओळख सर्वदुर आहे त्यांनी भारतीय समाजात शतकानुशतकांच्या जातीच्या उतरंडीवर पिचुन सगळयात शेवटी उभ्या असलेल्या दलीत समुदायामध्ये पेटवलेली चेतना आणि एकहाती घडवुन आणलेली क्रांती त्यांना महामानव पदापर्यत घेऊन जाते त्यांच व्यक्तीमहत्व सर्वव्यापी आहे.

धर्म मानवंशशास्त्र सामाजिकशास्त्र, राज्यशास्त्र एकना अनेक असे कोणतेही विषय त्यांच्या प्रशेच्या कक्षेतुन सुटले नाहीत. पण त्यांच्या उपलब्ध सर्व लेखनातुन भाषणांतुन इतर साहीत्यात्यातुन एक गोष्ट प्रकर्षान जाणवते ती म्हणजे त्यांच्या बुध्दीच्या आणि हदयाच्या सर्वात जवळ असणारा विषय होता अर्थशास्त्र.

## भारतीय बँकींग व्यवस्थेचा रिझर्व्ह बँक पर्यंतचा इतिहास

भारताची गंगाजली सांभाळणारी चलन नियंत्रण करणारी सगळया बँकांची शिखर संस्था असलेली भारतीय रिझर्व्ह बँक ही १ एप्रिल १९३५ रोजी अस्तित्वात आली पण त्या अगोदर ईस्ट इंडिया कंपनीचा भारतात प्रभाव निर्माण झाल्यापासुन ते ब्रिटीशाची औपचारीक शासनयंत्रणा स्थापन होईपर्यंत भारतीय अर्थव्यवस्था अनेक स्थित्यारातुन गेली होती.

तिच्या सामोर कायमच एक प्रश्न होता तो बँकिंगचा ती व्यवस्था टप्पाटप्पात तयार होत गेली. राहुल बाजोरिया यांच्या स्टोरी ऑफ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या पुस्तकात त्यांनी हा अनेक वळणवळणांनी घडलेल्या इतिहास लिहीला आहे.

ईस्ट इंडीया कंपनी तर्फे भारतात ब्रिटिश साम्राज्याचा पाया रचणा-या सुरुवातीच्या काही लोकामध्ये वॉरेन हेस्टिंग्सच नाव कायम येते त्यांनी १७७३ मध्ये पाहिल्यादा जनरल बँक ऑफ बंगाल एंड बिहार ही कंपनीच्या व्यवहारासाठी स्थापन करावी असे म्हटले होते..

### अर्थशास्त्र आंबेडकर आणि दी प्रॉब्लेम ऑफ रुपी

डॉ.आंबेडकरांनी भारतीय राजकाणात नवा प्रवाह आणला जो जातीच्या प्रभावामुळे हजारो वर्ष लुप्त होता पण ते त्यांच ऐतिहासिक कार्य लक्षात घेताही हे दिसत की त्यांचा मनाची मुळ विण ही अर्थशास्त्राची होती भारत आणि त्यांच्या इतिहास वर्तमान भविष्य यांच्याभोवती फिरणा त्यांचा अर्थविचार हा विद्यार्थीदिशेपासुन दिसतो.

१९१३ मध्ये जेव्हा ते न्युयॉर्कच्या कोलबिया विद्यापिठात पोहचले तेव्हा तिथले अर्थशास्त्रचे प्राध्यापक एडविन सोलिगनम यांच्या प्रभावन त्यांनी पदुव्युत्तर पदवीसाठी अर्थशास्त्र हा विषय निवडला तेव्हा एम.ए.साठी जो प्रबंध त्यांनी लिहिला तो होता. Adiministrartion and Finace of the East India Company १७९२ ते १९५८ हा कालावधी त्यासाठी बाबासाहेबांनी घेतला होता याच काळात ईस्ट इंडीया कंपनीची पाळेमुळ भारतातले रुजली त्यामुळ भारतातल्या प्रशासन आणि वित्तव्यवहारावर कसा परिणाम झाला आणि त्यांन भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला अशी मांडणी बाबासाहेबांनी केली एकीकडे भारतातल ऐहिक जीवन कस बदलल हे सांगतांनाच ब्रिटीश सत्ता ही भारतीयासाठी आर्थिक गुलामगीरी कशी ठरली याची निर्भिडपणे मांडणी डॉ.आंबेडकर करतात.

**यंग कमीशनपुढे डॉ.आंबेडकरांची साक्ष**

डॉ. आंबेडकरांच्या या प्रबंधाची आणि पुस्तकाची मोठी चर्चा अर्थविश्वात झाली ब्रिटीश सरकारन यापूर्वी ही भारतीय चालनाच्या प्रश्नात लक्ष घालण्यासाठी आणि उपाय सुचवण्यासाठी रॉयल कमीशनची स्थापना केली होती प्रा.केन्स यांचया अहवाल होताच

**भारतीय बँकींग-** विश्वातुन चल स्थिर करण्यासाठी उपाय योजण्यात यावेत अशी मागणी होत होती या पाश्वभुमिवर ब्रिटीश सरकारान हिल्टन यंग यांच्या नेतृत्वात १९२५ मध्ये रॉयल कमिशला विचार विनिमय करुन सूचना करण्यासाठी भारतात पाढवले.

**रिझर्व्ह बँकेची स्थापना - हिल्टन यंग**

कमीशन त्यांच्या अहवालात केलेल्या सुचनांचा स्विकार करुन तत्कालीन ब्रिटीश सरकारने १९२७ मध्ये रिझर्व्ह बँक बिल आणले या बँकेला बाजारात चलन जारी करण्याचे अधिकार होते आणि तिची स्वायतता टिकवण्यासाठी तिच्या व्यवस्थापनावार राजकिय व्यक्तीच्या नेमनुका करता येणार नव्हत्या पण अनेक मतमातांतर असल्यान हे विधेयक लगेच संमत झाल नाही १९२८ मध्ये सुधारित विधेयक आणले गेले पण तरीही बराच काळ वाद होत राहिला.

**अनिकेत चंद्रमणी डोंगरे**
**बी.ए.भाग - २**

# भ्रष्टाचार : एक सामाजिक समस्या

स्वातंत्र्य मिळल्यापासून आपल्या देशात अनेक समस्या उत्पन्न होऊ लागल्या आहेत. त्यावेळी नवीन राष्ट्राच्या निर्मितीची समस्य प्रमुख होती. परंतु त्यासोबत सांम्प्रदायिकता, जातिवाद, भाषावाद,प्रांतवाद, बेकारी, व भ्रष्टाचार या समस्या उत्तरोत्तर वाढत गेल्या आज अशी स्थिती आहे. की या सर्व समस्यांनी संपूर्ण देश आक्रंदत आहे. आणि त्यातही भ्रष्टाचाराची समस्या प्रत्येक क्षेत्रात आणि सर्व थरात अशा प्रकारे वाढत आहे, की तिला संपविणे अत्यंत कठिण झालेले आहे. जेव्हा देशाचे पुढारीच भ्रष्ट असतील, राजकीय व शासनतंत्र वर पासून खालपर्यत सर्वत्र भ्रष्टाचारात बुडालेले असेल तर या समस्याचे निवारण कोण करु शकेल ? असे वाटते की भ्रष्टाचार आज देशात शिष्टाचार झालेला आहे, अन् त्या समोर राष्ट्रीयता व चारित्र्य हे गुण गौण झाले आहेत. यामुळे आपल्या देशाची प्रगती होणे संभव नाही.

भ्रष्टाचार दोन शब्दांनी मिळून तयार झाला आहे. भ्रष्ट व आचार भ्रष्टाचाराचा हा शाब्दिक अर्थ आहे. नीच आचरण म्हणजे, असे आचरण की जे स्वत:च्या स्वार्थापासून सुरु होऊन दुस-याच्या अहित होण्यावर संपते. भ्रष्टाचारी व्यक्ती स्वार्थामध्ये आंधळा होऊन विसरतो की, आपल्या दुष्कृत्यामुळे तो किती लोकांचे नुकसान करत आहे, व स्वत: बरोबर इतरानांही त्या चाकात ओढत आहे.

भ्रष्टाचार वाढवण्याचे पहिले कारण स्वार्थच आहे. स्वार्थाशिवाय देखावा करणे याचे दुसरे मुख्य कारण आहे. प्रत्येकाला आपणच श्रेष्ठ आहोत हे दाखवायचे असते आणि त्या प्रयत्नात तो विसरतो की तो काय अनर्थ करत आहे. आज मानवाने आपल्या गरजा इतक्या वाढवून ठेवल्या आहेत की, त्यांच्या पुर्ततेसाठी तो इतरांचे शोषन करत असतो. भ्रष्टाचारामुळे आज देशात लोकांचे राष्ट्रीय चरित्र व त्याचे सोबत सांस्कृतिक मूल्यांचे पतन होत आहे. सामाजिक जीवनात नैतिकता नष्ट होत चालली आहे. स्वार्थ आणि प्रलोभनामुळे आपले आदर्श ते विसरत चालले आहे.

राजकारणामध्ये सर्वात जास्त भ्रष्टाचार माजलेला आहे. जेव्हा नेतेच भ्रष्ट आचरण करण्यात मग्न झालेले असतात व आपल्या परिवारासाठी चुकीच्या मार्गाने धन - संपत्ती साठवितात, प्रत्येक कामात कमिशन आणि लाच घेवून जनतेच्या समोर मात्र स्वत:ला आदर्श आचरण करणारे दाखवितात, तेंव्हा त्यांना पाहून सरकारी चाकर, अधिकारी व जनतासुध्दा तसेच आचरण करु लागले आहेत. भ्रष्टाचारामुळे महागाई, पंचवार्षिक योजनांची विफलता, मंद विकासाची गती इत्यादी अनेक समस्या देशासमोर वाढत आहेत. संपत्तीचे लोभी, भौतिक सुख - भोग विलासी व स्वार्थी लोक

त हेत हेचे अनाचार पसरवित आहेत. व त्या कारणाने आमची व्याक्तिगत, राष्ट्रीय व सांस्कृतिक पातळी अत्यंत खालावलेली आहे. आणि आम्ही मानवीय आदर्शापासून पतित झालेले आहोत.

भ्रष्टाचाराचे निवारण करण्यासाठी जरी सरकारने वेगळा भ्रष्टाचार निर्मूलन विभाग बनविलेला आहे, त्याला व्यापक अधिकार दिलेले आहेत. वेळो - वेळी कायदे बनविले जात आहेत, याला अपराध म्हणून कठोर शिक्षाही आहे, तरीही देशात भ्रष्टाचार वाढतच आहे. भ्रष्टाचाराच्या निर्मूलनासाठी सर्वात आधी जन-जागरणाची गरज आहे. राजकारणात आदर्श आचरण व नैतिक मूल्यांची गरज आहे. राजनेत्यांनी स्वत: भ्रष्टाचारांपासून लांब राहिले पाहिजे. तरुणांना त्यांच्या योग्यतेनुसार रोजगार मिळायला हवा. शालेय शिक्षणात चरित्र विकासाला प्रमुख स्थान असायला पाहिजे. सामाजिक जीवनात सांस्कृतिक मूल्यांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. या त-हेचे उपाय करुन आपल्या देशातून भ्रष्टाचाराचे निर्मूलन होण्यास मदत मिळेल व आपला देश, मानवता आणि आदर्शाचे रक्षण होईल.

**कु. प्राची राखोंडे**
**बी.ए.भाग-३**

# महागाईचा भस्मासूर

हल्ली सगळयाच वस्तुच्या किंमती अगदी आकाशाला भिडल्या आहेत. एखाद्या वस्तुच्या भरमसाट किंमतीमुळे सर्वच घरामधील लोकांची कुचंबणा होते. महागाईमुळे लोक चक्क पोळून निघतात.

घरातल्या वयस्करव्यक्ती त्यांच्या तरुणपणातल्या स्वस्ताईचे वर्णन करताना सांगतात, आमच्या वेळेस रुपयाला पंधरा शेर दूध मिळे, पंधरा विस रुपयांत महिन्याचा खर्च भागवून पाच - सहा रुपये शिल्लक पडत असत. घरमालकाला जागा भाडयाने देण्यात कमिपण वाटे. झाडझूड करुन दिवा लावावा, एवढीच त्याची अपेक्षा असे. तुमच्याइतके कपडे आम्हांला कधी लागतच नसत. एक अंगावर आणि आणि दांडीवर ! या गोष्टी तर अरबी भाषेतल्या कथाच वाटतात.

अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. परंतु या तिन्ही गोष्टीच्या किंमती प्रचंड वाढलेल्या आहेत. वर्तमानपत्रातून ब-याच वेळा भूकबळीच्या बातम्या आपण वाचतच असतो. त्यातील गरिबीला आणि उपासमारीला कंटाळून आपले व आपल्या मुलाबाळांचे आयुष्य निघृणपणे संपवणा-या पतिपत्नींच्या कहाण्या मन बेचैन करतात. आत्यंतिक दारिद्रयातूनच चो-यामा-या, भ्रष्टाचार या अनीतीच्या वाटा फुटतात. सहा कोटी लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहेत. हे सारे रोखण्यासाठी महागाई विरोधी मोर्चे काढले जातात. पण हे सारे प्रयत्न खरेतर निरुपयोगी
आहेत.महागाई वाढण्याचे मुख्य कारण बेसुमार वाढणारी लोकसंख्या हे आहे. उत्पादनात कितीही वाढ झाली तरी वाढत्या लोकसंख्येमुळे मागणीचे प्रमाण वाढतच राहते. काही जणांना असे वाटते की लोकसंख्या कमी केली की महागाई कमी होईल. पण ही समजूत चुकीची आहे. खरा उपाय हा की लोकांची कार्यशक्ती वाढली पाहिजे. त्यांचे उत्पन्न वाढवले पाहिजे. म्हणजेच लोकांना नोक-या, व्यवसाय वा वेगवेगळे उद्योगधंदे उपलब्ध करुन दिले पाहिजे. लोकांच्या हातात पैसा आला की विविध क्षेत्रांतील उत्पादन वाढेल. अधिक नोक-या - व्यवसाय निर्माण होतील. त्यामुळे आणखी उत्पादन वाढेल. या त-हेने आपली अर्थव्यवस्था मजबूत होईल. आणि महागाईचा ताप होईनासा होईल.महागाई रोखण्याचा खरा उपाय हा आहे. तो जर अमंलात आणला नाही तर हा भस्मासूर कोणकोणाला भस्म करील ते सांगता येणार नाही.

**ओम केनेकर**
बी. कॉम. भाग - २

---

# मातृभाषा मराठीचे वैभव

हजारो वर्षापूर्वी लिहिला गेलेला श्रवण बेळगोळ येथे गोमटेश्वराच्या पुतळयाखाली मराठी भाषेतील पहिला शिलालेख आढळतो, तर मराठीतील आद्यग्रंथ म्हणून ज्ञानेश्वरीचा उल्लेख करतात. मातृभाषेचे महत्त्व ओळखून ज्ञानेश्वरी संस्कृत भाषेतील भगवद्गीता प्राकृत भाषेत अनुवादित केली. मातृभाषेतील असणारा आदर भाव व्यक्त करताना ज्ञानेश्वर म्हणतात. माझ्या म-हाटीची काय बोलु कवतुके

मराठी भाषेत अनेक थोर विद्वान नररत्नाची आचर्य अत्रे भा.द.खेर कुसूमाग्रज अशा या श्रेष्ठ साहीतीकाची यादी न संपणारी आहे. या सर्वानिच मराठी साहीत्यात मोलाची भर घातली आहे. आपले सर्वाचे लाडके श्री मानकर काका सुध्दा टॉनिक सारखे मराठी अंक काढतात. हा मराठी भाषेचा सन्मानच आहे. आपला भारत देश इंग्रजाच्या गुलाम गिरीतुन मुक्त झाला. तरीही इंग्रजी भाषेने आपल्या देशात भक्कम पाय रोविले आहेत. आज पालक मुलाना इंग्रजी शाळेत घालतात. उच्च शिक्षण मराठी भाषेतुन उपलब्ध नाही. खर तर मातृभाष हे शिक्षणाचे माध्यम असावे. कारण लहानपणा पासुन शिकल्यामुळे आपले विचार व्यक्त करणे सोपे जाते. मातृभाष ही ज्ञानभाषा झाली तर शिक्षण सुलभ होईल.

याचा अर्थ असा नाही की परकीय भाषा शिकु नये परकीय भाषा जरुर शिकण्यात या भाषाचा आदर करावा.परंतु त्याच वेळी आपल्या मातृभाषेकडे दुलर्श करु नये मराठीतील चांगल साहीत्य वाचावे मराठी भाषेतुन संवाद साधावा मराठी भाष ही सहज सोपी सरळ भाषा आहे.आपल्या भाषेचे महत्व ओळखुन आपण तिचा आदर करायला हवा कारण -

माझ्या मराठीचि बोलू कौतुके । परि अमृतातेहि पैजा
जिंके । ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।।

**कु. आदिश्री हिरुरकर**
बी.कॉम. भाग - १

## सोशल मीडिया आणि सायबर क्राईम

मीडियाच्या मुख्य तीन प्रकारात प्रिंट मीडिया इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि सोशल मीडिया याला सायबर मीडियाअसेही म्हणतात. प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मीडियाला संपादक, वृत्तपत्र मालक, चॅनल्स चालविणारे व्यक्ती व कंपनी हे असतात. मात्र सोशल मीडियाला कोणी जबाबदार सापडत नाही. याला लोकांनी लोकांसाठी बेछुट पध्दतीने चालविलेले एक माध्यम असे म्हणता येईल. परिणामी अपूर्ण अनेक दोषपूर्ण माहिती यातून खूप वेगाने प्रसारित होते,तर अनेकवेळा याचे परिणाम समाजाला भोगावे लागतात.सोशल मिडिया हे एक वेगळे प्रसारमाध्यम आहे. संपूर्ण जगाशी जोडणारा एक मोठा नेटवर्क आहे. लोक प्रियतेच्या प्रसारासाठी हे एक उत्तम व्यासपीठ आहे. राजकिय पक्षानीही याचा वापर वाढविला असून सोशल मिडीयासाठी प्रमुख असे पदाधिकारही नियुक्त केलले आहेत. आता तर

अनेक बाबी उदा. चित्रपट, ट्रेलर, व्हिडीओ, विशिष्ट संदेश सोशल मिडियाव्दारे प्रसारित केल्याजातात. हया मुळे लोकांच्या मतांवर अनुकूल प्रतिकुल प्रभाव पडतो सोशल मिडिया व्दारे सायबर गुन्हयाच्या मोठा प्रश्न उभा होत आहेसोशल मिडियाचा वापर कारणा-यांना खुप घाई असते.कोणतीही माहिती किवा गोष्ट पाहिली किवा समजली की जशी दिसत आहे तशीच व्हॉट्‌ॲप व फेसबुकवर टाकण्याची जणू स्पर्धा असते.परंतु त्या घटनेचा सर्व बाजुचा विचार न घेता त्यातील खरे खोटे न समजता अनेक तुकडयानमधुन ती माहिती समोर येते. सोशल मिडीया हे अफवा पसरविण्याचे माध्यम तर होत नाही ना ? असा प्रश्न अनेक घटानांवरुन उपस्थीत होत आहे.एकुणच सोशल मिडियामुळे प्रत्येकाला हवा तो विचार हवा तेंव्हा हव्या त्या पध्दतीने मांडण्याची सुविधा मिळाली आहे. प्रत्येकालामनमुराद व्यक्त होण्याचे स्वंतत्र्य मिळाले आहे. या स्वांतत्र्याचा आपण जबाबदारीने वापर करतो का ? यांचा विचार सोशल मिडिया वापरणा-या प्रत्येकाने करायला हवा असे मत मुक्तस्त्रोत तंत्रज्ञानामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणारे प्रशिक्षक प्रसाद शिरगावकर याने व्यक केले आहे.प्रत्यक्षात कोणत्याही घटना व दुर्घटनेचे वृत्त देणे किवा त्या विषयी प्रतिक्रिया देणे यांचे आपल्याला स्वंतत्र्य आदेश पण करताणा आणि जाहीर पणे मत, प्रतिक्रिया देताना काही कर्तव्या आणि जबाबदा-या आहेत यांचीजाणीव घेवून व्यक्त झाले

पाहीजे तेव्हा एकुणच सोशल मिडीयावरुन सोशल होताना भान ठेवण्याची गरज प्रत्येकाला आहे.जबाबदारीची जाणीव तसेच किवा असुनही ती आपण बाळगत नसु तर सोशल मिडीया बेजबाबदारच होत राहील ऐवढे मात्र खरेच. शेवटी सोशल मिडीया वर काही टाकताना सकारात्मक विचार करुन टाकले पाहीजे फक्त खळबळ निर्माण करण्याचा उद्देश नसावा, माझे प्रयत्न काही तरी छान करण्याचे आहे,असा विचार सतत

सुखनंदन शेळके
बी. ए. भाग - १

## समाज सुधारक महात्मा ज्योतीबा फुले

माझा आवडता समाजसुधारक महात्मा फुले हे आहेत. त्यांचा जन्म इ.स. १९२७ मध्ये झाला. त्यांचे मूळ घराणे साता-याजवळील कटगुण गावचे होते. महात्मा फुले यांचे पूर्ण नाव जोतीराव गोविंदराव फुले होते. त्यांचे मूळ आडनाव गो-हे होते. पण त्यांनी फुलांचा व्यापार केल्याने लोक त्यांना 'गो-हे' ऐवजी 'फुले' या आडनावाने संबोधू लागले.

महात्मा ज्योतीबा फुले एक वर्शाचे असतानाच त्याची आई चिमणाबाई यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या पालनपोशणाची जबाबदारी त्यांचे वडील गोविंदराव यांच्यावर येवून पडली. महात्मा फुले यांचे प्राथमिक शिक्षण १८३४ व ३८ या काळात झाले. फुले हे अभ्यासू व चौकस होते. त्याची शिक्षणातील प्रगतीही चांगली होती. परंतु ज्योतिबांच्या वडिलांनी ज्योतीबाचे शिक्षण बंद करून बागकामात लावले होते. नंतर इ.स. १८४१ मध्ये त्यांचे नाव मिशनरी शाळेत दाखल करण्यात आले. तेथेच त्याचे माध्यमिक शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले. या शाळेत ते १८४७ पर्यत होते. शिक्षणाबरोबरच निवृत्त झालेल्या लहुजीबुवाकडून तालमीचे कुस्ती, दांडपट्टा, नेमबाजी इत्यादीचेही शिक्षण घेतले होते.

त्यापूर्वीच इ.स १८४० मध्ये नायगावच्या खंडोजी नेवसे - पाटील यांच्या कन्या सावित्रीबाई यांच्याशी त्याचे लग्न झाले. त्यावेळी ज्योतीबाचे वय १३ वर्शे तर सावित्रीबाईचे वय नऊ वर्शाचे होते.

इ.स १८४८ मध्ये ज्योतीबांनी पुण्यामध्ये पहिली शाळा बुधवार पेठेतील भिडयांच्या वाडयात सुरू केली. या शाळेत स्वतः ज्योतीबा शिक्षक म्हणून काम करित असत. त्यांनी सावित्रीबाईना लिहीण्या - वाचण्यास शिकवले , आणि त्याची शिक्षीका म्हणून नेमणूक केली. पुढे इ.स. १८५१ मध्ये बुधवार पेठेतील चिपळुणकरांच्या वाडयात मुलींची दुसरी शाळा त्यांनी उघडली. तसेच रास्ता पेठ व वेताळ पेठ येथे शाळा सुरू केल्या. इ.स. १८७३ मध्ये पुण्यात त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ज्योतिबा फुले हेच या संघटनेचे पहिले अध्यक्ष होते. सार्वजनिक सत्यधर्म, शेतक-यांचा आसुड, गुलामगिरी हे त्याचे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. इ.स १८८८ मध्ये जनतेने मुबंई येथे 'महात्मा' ही पदवी त्यांना बहाल केली. इ.स. १८ नोव्हेंबर १८९० रोजी त्यांचे निधन झाले.

**कु.प्रतिक्षा राखोंडे**
**बी. ए. भाग - १**

.....

## माय आणि बाप

आई म्हणजे काय ...
हदयाच्या प्रत्येक ठोकयाचा आवाज
म्हणजे आई...
त्या ठोक्याला पुर्ण करणारा
म्हणजे बाप
आई म्हणजे काय ...
तर हदयातून निघणारा श्वास
म्हणजे आई...
त्या श्वासातून निघणारा ध्यास
म्हणजे काय...
तर दिवसाच्या सुर्य किरणे
म्हणजे आई
सुर्य किरणे बनुन उण बनुन
पुरवणारा म्हणजे बाप ...
आई म्हणजे काय ...
सकाळी सुर्य पहाटेपासुन उठवणारी
उठवणारी ती म्हणजे आई ...
आणि रात्री स्वत:चे डोळे लागेपर्यंत
मांडीवर झोपवणारा म्हणजे बाप ...

***तेजस उत्तम सांगळे***
बी.कॉम. भाग - ३

## बंजारा समाज आणि होळी

बोंबा आल्या. होळी सणाला बंजारा समाजात वेगळीच बोंब असते. आणि त्याच बरोबर या सणाला फार मोठा धार्मिक सण असे मानले जाते. पूर्वी बंजारा समाजात दिपावली संपताच होळीला सुरुवात व्हायची. हा समाज अत्यंत कष्टाळू आहे. ह्या समाजातील शेतकरी रात्रदिवस काबाडकष्ट करतो. दीपावली संपल्यावर शेतातील शेत मालावर रात्री जागरण करावे लागते. रात्री डफडा घेवून हा शेतकरी राखणी करतो, शेतात जातो आणि अशा रात्रीच्या वातावरणात कडाक्याच्या थंडीत होळी सणाकरिता म्हणावयाच्या गाण्याची रचना करतो. डफ वाजवून गाणे म्हणण्या मागे दोन उद्देश साध्य होते. रखवालदार शेतात असल्याबाबत चोराला खात्री पटते व रात्री शेतमालाची नासाडी करणारे जंगली प्राणी शेतात फिरत नाही, अशा दुहेरी उद्देशाने होळीच्या गाण्याला सुरुवात होते. जंगलात ते ही रात्री आजू बाजूला कोणीही नाही अशा वातावरणात होळीला साजेशी अशी गाणे म्हणत शेतातील शेतमाल पूर्ण जमा झाल्यावर रात्रीच तांड्यातील जवान पोर जमतात. मागील दोन-तीन महिन्यातील गाठणाऱ्या थंडीत गरम गरम जोडलेली गाणी आनंदात बुडून डफाच्या तालावर गातात. होळीचे गाणे म्हणायचे सुरुवातीला आया बहिणींची व थोरांची श्रमा मागतात.

**|| सामळोये याडी काकी ये दादी होळी बोलच भांड होळी बोलच भांड, माफी देदो होळी बोलच भांड ||**

आई, काकू व आजी आम्ही जी होळीची गाणे गातो ती आम्ही गात नसून प्रत्यक्षात होळीचेच अशा प्रकारे भांड गाणे गातो म्हणून आम्हाला क्षमा करावी अशा प्रकारची सुरुवात करून होळी गाणे गाण्यास तयार होतात. मात्र त्यांच्या अंगात जणू काही होळीच संचारल्या सारखी आणि त्या गारठया थंडीच्या रात्री जोडलेल्या होळी गाण्याला सुरुवात होते.

**“आंबारे आंबराईम केर छोरी कररी**
**रखवाल,आंबारे आंबराईम चव्हाणेर**
**छोरी कररी राखवाल झोलो देगी रे,**
**झोलेम बलान, झोलो देगी रेपाडेरो**
**आंबा वटान लेगी रे, झोले देगी रे....”**

आंब्याच्या आमराईत कुणाची पोरगी राखण करतांना दिसते त्यात दुसरा बोलतो की, त्याचा ज्या जातीच्या पोरीशी संबंध झालेला असेल अशा जातीचा उल्लेख करून (चव्हाण) जीची पोरगी आंब्याच्या झाडाखाली राखण करत बसली असे बोलतो. आणि पुढे जाताजाता हिने मला इशारा केला असून त्या इशाऱ्यात तिच्या मागे झालेला म्हणजे लवणा काठच्या घनदाट अरण्यात येण्यास सांगितले असेही तो बोलतो ही पोरगी आंब्याखाली बसलेली आहे हे भासविण्याकरिता पुन्हा बोलतो की पाडाचा आंबा घेवून गेली अन मला खुजावून गेली.

एवढेच नव्हे तर देवदिकांची स्तुती करणारी गाणी देखील गायिल्या जाते. सेवादास

सुधारणेची उजळणी करून समाजात त्याबाबत नवीन चेतना निर्माण केली जाते. संत सेवादास महाराज यांनी घेतलेल्या समाधीला प्रामुख्याने यात उल्लेख करून समाजातील नविन युवक-युवतीला त्या बाबत जाण दिली जाते.

**होळीचा पहिला दिवस**

**भर तलांगानेती आई घरे होळी,**
**होळी डगर चली होळी आई रे**
**होळी दस दन रेन्ह आई रे फेर**
**गेरीया नाचतो होळी आई रे ......**

अशा प्रकारे होळीची गाणी गात-गात होळीच्या पहिला दिवस उगवतो. त्या दिवसाला बंजारा समाजात होळीची पाल असे संबोधण्यात येते. या दिवशी पोर्णिमा असते. बंजारा समाजा व्यतिरिक्त सर्व समाजात आजच्या दिवशी होळी असते. मात्र बंजारा समाजात होळीची पाल असते. बंजारा समाजातील तांड्या तांड्यात वसलेली सर्व मंडळी आजच्या दिवशी कुणीही कामाला जात नाही.

संध्याकाळी गोडधोड करून खातात व रात्री दहाचे सुमारास गाव प्रमुखाचे (नायक) घरी होळीचा डाव मांडल्या जातो. गाव प्रमुख येथे जमलेल्यांना वयोवृधांची मिटिंग बसलेली असते. आपल्या धुंदीत त्या पाडयाच्या आंब्याची किंवा ह्यापेक्षाही सरस असलेली गाणी गात नाचतात. वयोवृद्ध मंडळीत होळीची (दिंडी) काढण्याबाबत चर्चा सुरु असते.

दांडी म्हणजे होळीतील श्रीकृष्ण व होळी त्यांना जळत्या होळीतून बाहेर काढावे लागते. त्याकरिता विभिन्न कुळातील अर्थात बंजारा जमातीचेच दोन युवकांची निवड केल्या जाते. ती निवड वैशिष्टपूर्ण असते त्या दोन युवकांचे आडनाव विभिन्न असावेत, हे अविवाहित असावेत, आणि याच वर्षी यांची लग्न व्हायला पाहिजे अशा बाबींचा प्रामुख्याने विचार केल्या जातो. ह्या सणाच्या कामाकरिता ( दांडी) काढण्याकरिता माझ्या पोराचा नंबर लावण्यासाठी कित्येक लोक भांडतात. होता होई पर्यंत सामोपचाराने विचार केला जातो पण काही वेळेस मात्र भांडणाचा प्रकार घडतो. ह्या कामाकरिता दोन युवक नेमल्यानंतर दरवर्षी ज्या ठिकाणी होळी जाळली जाते त्याच ठिकाणी जावून त्या जागेची पूजा करतात. ती नेमलेली दोन युवक गावातील युवकांच्या मदतीने रात्रभर लाकडे जमा करण्याचा व्यवसाय जोरात करतात. सकाळी ६ वाजेच्या पहिले गावातील सर्व लहान थोर पुरुष मंडळी होळीच्या ठिकाणी आंघोळ करून नविन कपडे घालुन जमतात व सकाळी ६ वाजता होळी जळतात.

**|| ओरे बाळारो हुओरे तेवार मोड मोड किदी संणगार ||**

## होळीचा दुसरा दिवस

होळीच्या दुसऱ्या दिवशी पूर्वजांना चूलीमध्ये भोग देऊन नैवेद्या दाखविला जातो. नंतर गावकारभार पाहणारे कारभारी यांचे घरी होळीचे ठिकाणावरून सरळ जातात व त्या

ठिकाणी १ ते २ तास नाचतात तो पर्यंत स्त्रिया घरी आपल्या पूर्वजांना नैवेद्या दाखविण्याकरिता खिर, शिरा, आपआपल्या परीने जमेल तसे भोजन तयार करतात आणि आपल्या वडिलांना नैवेद्या दाखवितात. जेवण आटोपल्यावर दिर मंडळी मात्र आपआपल्या भावजईला दिवसभर सतावतात, बोंबा काय मारतात. अश्लील काय बोलतील, गाणी काय गातील, त्यातल्या त्यात तर ज्या बिचारीला पोरगा झाला असेल तिचे हाल तर पहिल्या जात नाहीत. याच दिवशी संध्याकाळी होळीवर जन्मलेली मूलेच फक्त दर्शनाकरिता होळीवर गावातील सर्व बायासह जातात. ह्या मुलांना गावातील प्रत्येक घरचा एक साखरेचा बत्तासा देतात. संध्याकाळी होळीचे दर्शनानंतर पुन्हा रात्री उशिरापर्यंत युवक मंडळी ज्यांचे घरी मुलगा झाला त्यांचे घरासमोर जाऊन होळीचे गाणे गातात.

## होळीचा तिसरा दिवस

होळीच्या तिसऱ्या दिवशी पहाटेलाच धुलीवंदनला सुरुवात होते. खेडयातील गरिबांची मुले जंगलातील पळसाच्या फुलांना सुकवून बारीक वस्त्रातून गाळ करून भिजू घालुन त्यापासून केलेला रंग एकमेकांच्या अंगावर किंवा आपल्या भावजयीच्या अंगावर फेकतात. पुन्हा ज्यांच्या येथे पोरगा झाला त्यांचे घरी सक्तीने मद्याची मागणी करतात व मद्यपान घेतल्याशिवाय सोडत नाही. घरोघरी जावून एकमेकांच्या अंगावर पाणी, रंग, चिखल फेकीचा प्रकार चालू असतो. त्याच्या तोंडाला तर अजिबात विश्रांती नसते. कोणी बोंबा मारतो तर कोणी शिव्या देतो असा प्रकार गावातील शेवटच्या घरापर्यंत पोहोचल्यावर आप, आपले घरी जातात. रंगाने चिखलाने भरलेले कपडे उतरवून थोडा आराम करतात. घर बांधणे" धुंड" म्हणजे नैवेद्य कुण्या बाईला मुलगा होत नसेल तर ती या होळीला नैवेद्य कबुल करते म्हणजेच "धुंड" कबुल करते. माझा मुलगा झाल्यास मी धुंड करेन, जर होळीला धुंड कबूल करते केल्या प्रमाणे मुलगा झाल्यास त्या दिवशी संध्याकाळी ४ च्या सुमारास हा खेळ सुरु होतो. चांगले २-३ फुट खोल दोन अंतरावर दोन लाकडे जमिनी मधे पक्के सिनारतात. दोन्ही लाकडाला दोर बांधतात. त्या दोरी खालून एक लांबी १५ ते २० फुट लाकुड घालतात आणि ह्या दोन्ही लाकडाच्या मध्यभागी खिर खुरमाचा मोठा गंज (डेग) असतो. गावातील युवकांनी ह्या लाकडाच्या साहाय्याने हे पक्के रोवलेले लाकूड उपटून खिर खुरमाचा डेग उचलून नेतात व दुर जावून खातात. मात्र ही रोवलेली दोन लाकडे उपटतांना नाच गाणे सुरूच असते. वरील प्रकार चालू असतांना गावातील वयोवृद्ध लोकांचा दावनी बांधण्याचा खेळ सुरु असतो. दुसरीकडे रात्री होळीच्या ठिकाणाहून पूजेत असलेला नारळ आणि साखरेच्या बत्ताश्याच्या हारांचा चुरा करून २० ते २५ फुट उंच खांबाच्या टोकाला बांधून त्या खांबावर चढून तो खाण्याचा प्रकार चालू

प्रयत्न करतात पण काय करणार बिचार ह्या खांबाच्या बुडाजवळ बऱ्याच बाया हातात काडया घेवून उभ्या राहतात. ज्या युवकांना खोबरा आणि बत्तासा खायचा असेल ते युवक मोठ्या जोरात त्या खांबावर चढणाऱ्या युवकांना बेदम मारतात. दोन तीन युवक त्यांना फार चकवतात आणि एखाद्याला चान्स मिळताच तो खांबावर चढण्याचा प्रयंत्न करतो व खुप मार खावून बेजार होतो. खांबावर चढणे कठीण होते. जो खांबावर नाही चढू शकत त्यांना त्या स्त्रिया बांगड्या पण घालण्यास सांगतात त्यात तर एखादयाला चिड येवुन पाठीला गोंधले बांधतो आणि झपाटयाने वर चढतो मात्र वर चढल्यावर तो राजाच होतों, खांब्यावर आरामात बसतो खोबरा खातो, चावतो, रस गिळतो आणि तोंडातील चुरा खांबाजवळील स्त्रियांच्या अंगावर थुकतो, तर चढलेला खाली उतरेपर्यंत ह्या स्त्रिया येथून जात नाही कारण उतरतांना पुन्हा याची पाठ शेकायची संधी असते. या स्त्रिया पण हुशार असतात सात ते आठ फुटावर एखादया स्त्रीच्या अंगावर उडी मारतो व पळून जातो.

"दारू दर दारू द बालाजी तारो भलो कर
आतराके दारू ती काई व्हीयरे लारे लारे मनुरियो ढेर व्हीयरे"

## होळीचा दिवस गेर सळोई

धुलीवदंनचे दुसरे दिवशी म्हणजे पौर्णिमेनंतर चवथे दिवशी बंजारा समाजात होळीची गेर हा सण असतो. ह्या सणाला घरोघरी तांड्या व वर्गणी करूनच पैसे जमा केल्या जाते.

त्या पैशात बोकूड घेवुन त्यांचे तांड्यात असलेले सर्व घरांच्या संख्ये इतके समान हिस्से पाडले जातात आणि मटनापासून "सळोई" बनविले जाते. बंजारा समाजात मटनापासून सळोई हा जो प्रकार असतो तो महत्त्वाचा मेनू आहे. कोणत्याही समाजातल्या मटन खाणाऱ्यांनी हा प्रकार खाल्यास ह्या सारखी चव कोणत्याही प्रकारे केलेल्या मटणाचा प्रकार याची बरोबरी करणार नाही असे त्यांना वाटेल. होळी नंतर मात्र कोणीही एकमेकांना वाईट बोलत नाही अशा प्रकारे बंजारा समाज होळीचा सण साजरा केली जातो.

कु.राखी जाधव
बी.ए. भाग - १

### साहस से हर कार्य करो

जीवन के इस कठीन सफर मे
हार ना कमी स्वीकार करो
नौकाओ की छोड प्रतिक्षा
तैर के दरिया पार करो
पंख काट दिये तो क्या
हौसलो की उडान भरो
हो चुनौतिया हम से बढकर
निरंतर तुम प्रहार करो
भले हि हो घनघोर अंधेरा
साहस से हर कार्य करो
प्रयत्न कर नयी ज्योती जलओ
सेवरे का इंतजार न करो
आंधियो से आंख मिलाओ
चहोना पर वार करो

गौरव चव्हाण
बी.ए. भाग - २

## आजची शेती आणि शेतकरी

देशात सत्तेवर येणारे प्रत्येक सरकार कर्जमाफीने शेतकऱ्यांना आपले मिंधे करताना दिसते. यामुळे शेतकऱ्याला तात्पुरते समाधान मिळते. परंतु त्याच्या समस्येचे खरेखुरे निराकरण होत नाही. तसे होत असते तर शेतकऱ्यांचे आत्महत्या कमी झाल्या असत्या.

सर्वसामान्य भारतीय शेतकऱ्यांकडे २.५ एकरापेक्षा कमी जमीन असते. देशातील शेतीयोग्य जमीनही झपाटयाने म्हणजे ६ टक्क्यांनी कमी होत आहे. मग शेतकऱ्याला समाधानकारक उत्पन्न मिळू शकत नाही. अनिश्चित पावसामुळे शेतकऱ्याचे वेळापत्रक कोलमडून जाते. वारंवार पडणारे दुष्काळ आणि भूजलाच्या घटत्या प्रमाणामुळे सिंचन अथवा विहिरीच्या पाण्यावर अवलंबून राहता येत नाही. शेतमजुरी ही दुर्मिळ होत आहेत. लहान शेतकऱ्याला यंत्रसामुग्री आणि कुशल मनुष्यबळ परवडत नाही. बी-बियाणे, कीटकनाशके आणि खते यांच्या पुरवठ्याबाबतही हीच स्थिती आहे. अपुऱ्या आणि अवेळी वीजपुरवठयाची समस्याही आहेच.

सहकारी शेतीचा उपक्रम केला तर शेतकरी इतर सहकारी प्रकल्पांप्रमाणे राजकारण्यांच्या हातचे बाहुले बनेल आणि पुन्हा शेतकरी वंचित रहिलच. शेतकऱ्याला पाणी, वीज आणि इतर संसाधने एकाच वेळेला उभी करावी लागतात. तुटपुंज्या पैशांमुळे शक्य होत नाही. परिणामी तो कर्ज काढतो. खरेदीदार त्याला पैसे 'उचल' स्वरुपात देतात आणि अतिशय कमी भावात त्याचे पिक घेतात. शेतकरी कर्जाच्या विळख्यात गुरफटून एके दिवशी मृत्यूला कवटाळतो. म्हणजेच शेतकऱ्याला अर्थसाह्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थाच त्याचे शोषण करीत असतात. बँका कर्ज देतात. पण त्यातही शेतकऱ्याला परिपूर्ण साह्य करून शकत नाहीत.

सर्व संसाधने वाजवी भावात योग्य वेळी देऊ शकणारी आणि उत्पादन रास्त भावात विकत घेणारी केवळ एकच संस्था शेतकऱ्यासाठी उपलब्ध झाल्यास समस्या व्यवस्थित सुटू शकतील. पण त्यासाठी महत्वाचे पाऊल उचलावे लागेल. ते म्हणजे शेतीला उद्योग म्हणून घोषित करणे. यामुळे शेतकरी हा उद्योगातील एक लाभधारक होईल. त्यची जमीन अल्प असली तरी त्याला काळजीचे कारण नाही. ती आणिआसपासच्या अशाच काही जमिनी घेवून मोठया कंपन्या गुंतवणूक करतील.

कॉर्पोरेट विश्वात पैसा खेळता असल्याने गुंतवणुकीत बाधा येणार नाही. जर जमीन पिकास फारसी योग्य नसेल, तर गुंतवणूकदार कंपनी तिथे अन्नप्रक्रियेचा कारखाना किंवा उत्पादन टिकविण्यासाठी शितगृह उभारू शकेल. जमिनी व्यतिरिक्त शेतकरी स्वतःचे आणखी काही योगदान या उद्योगात देत असेल. तर त्याला त्याचा अधिक फायदा मिळेल.

सर्वात महत्वाचे म्हणजे तंत्रज्ञान वापरता येईल. योग्य तेवढ्याच पाणी

वापराचा, ठिंबक सिंचनासारखा प्रयोग कॉर्पोरेट शेती करू शकेल. यंत्रसामुग्रीचा वापरही शक्य होईल. आज लहान शेतकऱ्याला ते शक्य नाही. कॉर्पोरेट शेती यंत्रसामुग्रीचे नियोजन करून तो वापरू शकतील. जमीन व हवामान कुठल्या पिकासाठी जास्त उपयुक्त आहे. याचा तांत्रिक अभ्यास आणि तो प्रत्यक्षात आणणे केवळ कॉर्पोरेट शेतीलाच शक्य होईल. वादळ आणि अवकाळी पावसाचा सामना करणे शक्य होईल. वाया जाणाऱ्या पिकांना विशेषतः फळांना रोखता येईल. भारतात सुमारे १६ टक्के शेतीचे उत्पादन विविध कारणांनी वाया जाते. शेतीशी संबंधित उद्योगांना कॉर्पोरेट क्षेत्र चालना देऊ शकेल. शेतकऱ्यांचे कुटुंबीय त्यात सहभागी होऊन आर्थिक लाभ उठवू शकतील.

ज्या पायाभूत सुविधा शेतीला आणि शेतीजवळील प्रदेशाला आज प्राप्त झालेल्या नाहीत त्या उभारणे शक्य होईल. भविष्यातील अमाप लोकसंख्येमुळे अन्नधान्याचा तुटवडा भासेल तेव्हा हायड्रोपोनिक्स, इरोपोनिक्स, बहुमजली शेती अशा नवनव्या प्रकल्पांच्या साह्याने तुटवडयावर मात करता येईल. नवकल्पनांचा अवलंब केल्यास भारत मोठया प्रमाणावर अन्नधान्य निर्यातही करू शकेल. तथापि हे शेतीच्या औद्योगिकीकरनाशिवाय शक्य नाही. शेतकऱ्यांच्या आणि राष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी शेतीला लवकरात लवकर उद्योगामध्ये अंतर्भूत करावं लागेल. परंतु राज्यकर्त्यांना आणि शोषकांना हे कितपत पचेल आणि रुचेल ?

कु.रसिका वानखडे
बी.ए. भाग - ३

# रामोशी समाजाचा इतिहास

रामोशी समाज हा महाराष्ट्रातील एक प्राचीन आणि पराक्रमी समाज मानला जातो. इतिहासात या समाजाचे स्थान गड-किल्ल्यांचे रक्षक, गुप्त माहिती पोहोचवणारे आणि लढाऊ परंपरा जपणारे म्हणून महत्त्वाचे राहिले आहे. महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सोलापूर, अहमदनगर आणि डोंगराळ प्रदेशांमध्ये या समाजाचे वास्तव्य मोठ्या प्रमाणावर आढळते."रामोशी" या शब्दाच्या उत्पत्तीबद्दल विविध मते आहेत. काही इतिहासकारांच्या मते हा शब्द "रानवासी" किंवा "रक्षक" या अर्थाशी संबंधित असू शकतो. प्राचीन काळापासून हा समाज डोंगराळ भागात राहत असल्यामुळे त्यांना त्या प्रदेशाची भौगोलिक माहिती उत्तम प्रकारे ज्ञात होती. त्यामुळे युद्धकाळात त्यांची मदत मोठ्या प्रमाणावर घेतली जात असे.छ. शिवाजी महाराज यांच्या काळात रामोशी समाजातील लोकांनी मराठा साम्राज्यासाठी महत्त्वाची कामगिरी बजावली. गड-किल्ल्यांची राखण करणे, शत्रूंच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, गुप्त संदेश पोहोचवणे आणि रात्रीच्या मोहिमांमध्ये सहभागी होणे अशी अनेक जबाबदाऱ्या ते पार पाडत असत. त्यांच्या चपळ हालचाली आणि डोंगराळ प्रदेशातील अनुभवामुळे गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीत ते अत्यंत उपयोगी ठरत.इंग्रजांच्या राज्यकाळात रामोशी समाजाने ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला. विशेषतः उमाजी नाईक हे नाव इतिहासात अत्यंत प्रसिद्ध आहे. उमाजी नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठाव करून अन्यायाविरुद्ध लढा दिला. गरीबांना मदत करणे आणि ब्रिटिशांच्या विरोधात लोकांना एकत्र आणणे यामुळे ते लोकनायक म्हणून ओळखले जाऊ लागले.ब्रिटिश सरकारने अनेक लढाऊ आणि भटक्या समाजांप्रमाणे रामोशी समाजालाही संशयाच्या नजरेने पाहिले. पुढे काही काळ त्यांना "गुन्हेगार जमात" म्हणून घोषित करण्यात आले. या अन्यायकारक धोरणामुळे समाजाला सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अडचणींना सामोरे जावे लागले. याचा परिणाम अनेक पिढ्यांवर झाला.स्वातंत्र्यानंतर परिस्थितीत हळूहळू बदल झाला. आज रामोशी समाज शिक्षण, सैन्य, पोलीस सेवा, राजकारण, कला आणि विविध व्यवसायांत कार्यरत आहे. समाजातील अनेक संघटना आपल्या इतिहासाचा अभ्यास करून वीर परंपरा जतन करण्यासाठी कार्य करत आहेत.रामोशी समाजाचा इतिहास हा महाराष्ट्राच्या शौर्य, संघर्ष आणि स्वाभिमानाच्या परंपरेचा महत्त्वाचा भाग मानला जातो. मराठा इतिहास आणि स्वातंत्र्यलढ्यात या समाजाचे योगदान विशेष उल्लेखनीय राहिले आहे

**संकलक - सौरभ लठ्ठाड**
बी. ए. प्रथम वर्ष
(साभार - सोशल मिडीया)

# नारी : कल, आज और कल

आधा विश्व समझी जानेवाली नारी आज भी अधूरी है । आज स्वावलंबी होकर भी परावलंबी है । कारण है परंपरा । परंपरा की जडे इतनी मजबुत है कि शिक्षित स्त्री भी उससे नहीं बच सकी । इसीलिए नारी के इतिहास (बीता हुआ कल) वर्तमान (आज) और भविष्य (आने वाला कल) के बारे में सोचना है । प्राचीनकाल से लेकर आधुनिक नारीकी समस्याएँ तथा परिस्थीतिओं को हम प्राचीनकाल मध्यकाल तथा आधुनिक काल कें बाँट सकते है । इन कालो के अंतर्गत दिखाई देता है कि नारी जिवन में कैसे कैसे परिवर्तन आता गया है साथही प्राचीनकाल से नारी ने क्या कुछ खोया क्या कुछ पाया है प्राचीन काल के अंतर्गत हमें वैदिक काल रामायण, महाभारत, की स्त्रियों का भी विचार करना पडेगा। प्राचिनकाल में नारी के देवी माता पत्नी कन्या ये रुप प्रधान माने गये है । प्राचीन काल मे स्त्री को देवी समझा गया है । किंतु स्त्री की कामना देवी बनना नहीं तो मानवी बनना रही है। रामायण काल तक स्त्री का रुप देवी, माता जैसा उदात्त रहा है किंतु महाभारत तक आते आते वह देवी से भोग्या बन गई । प्राचीन काल की नारी बधनो में जकडी शिक्षा तथा अधिकारो से कोसो दुर तथा पुरुषो के अधिन थी । बाल विवाह की समस्या सती प्रथा थी । साथही गौरवमयी बात स्त्री स्वयंवरा थी । आज तो यह भी स्थिति नहीं रही। प्राचीन काल में भी वैदिक युग में भी स्त्री की स्थिति अच्छी थी । मध्यमकालीन स्थिती में कोई विशेष अंतर नही अया । प्राचीन काल में देवी बनाकर अधिकारों से वंचित किया तो मध्ययुग में भोग्या बनाकर । स्त्री की कामना सदैव उसे मानवी समझा जाने की रही किंतु ऐसा किसी युग में नही हुआ । मध्यकाल अर्थात हिंदी साहित्य के रीतिकाल में स्त्री के शरीर का ही वर्णन है ।

मध्यकाल में एक और स्वतंत्रता आंदोलन था तो दुसरी और समाजसुधार आंदोलन । नारी की दशा सुधारने हेतु राजा राममोहन राय ने निर्दयी सती प्रथा का उन्मूलन किया । म.गांधी, म.फुले,स्वामी विवेकानंद आदी ने स्त्री सुधार के लिए प्रयत्न किए । परिणामतः स्त्री शिक्षित होकर अपने अधिकारों के प्रति जागरुक हो गई । परंतु पुरुषप्रधान संस्कृति का वर्चस्व बढने से स्त्री को कम समझा जाने लगा । एक और स्त्री शिक्षा तथा समाजसुधार के आंदोलन चल रहे थे तो दुसरी और स्त्री की आवाज को दबाने की कोशिश करनेवाला पुरुषवर्ग भी बन रहा था ।

आधुनिक काल सभी दृष्टि से आधुनिक रहा । समाज में नारी को समानता का दर्जा मिला । वह शिक्षित होकर अपने अधिकारो के प्रति जागरुक हो गई । अधिकार कैसे प्राप्त करना है यह आज की नारी समझ चुकी है । आधुनिक युग ने शिक्षा के कारण नारी के सामने नये नये क्षेत्र प्रस्तुत किए है । कितु इसके साथ नयी - नयी समस्याएँ बनती - बढती जा रही है । भारतीय समाज में नारी की स्थिती विभन्न कालों में और विभिन्न समाजो में भिन्न - भिन्न प्रकारकी रही है । प्राचीन काल में उसे शक्ति, ज्ञान एवं संपत्ती के प्रतिक रुप में माना गया है । बाद में मध्ययुग में देवी रुप से निकालकर भोग्या रुप में बिठा दिया गया । आज आधुनिक युग मे स्त्री की स्थिती में कुछ सुधार आ रहे है । वह स्वावलंबी, अर्थनिर्भर बन गई है । वह अधिकारों के प्रति सचेत हो चुकी है । हर क्षेत्र में खेल, ऑलंपिक,वैज्ञानिक,राजनीतिक आगे बढ रही है । जो आधुनिक काल एवं शिक्षा की देन है ।

**कु. प्रियंका जामनिक**
बी.ए.प्रथम वर्ष

## Dr. B. R. Ambedkar & His Thoughts

Bhimrao Ambedkar was born on 14th April 1891 in the Mahu district of Madhya Pradesh. His family belonged to a lower caste Hindu community (Mahar) which was considered as untouchables. The untouchables were barred from the society. They were not allowed to take water from the wells of upper caste villages which consisted Brahmins. They were also not allowed to take the same bead of education as Brahmins used to take. They were treated as slaves, who were born for the only purpose of seruning, upper caste (self proclaimed) peoples.


And in such horrible community Dr. Bhimrao Ambedkar was borned. In his childhood he was smart as well as a witty kid. He knew that if he wanted to get repect in such societal system. He must acquire the knowledge. So from the childhood only he started studding at the pace which was way different than any person of his era might have seen or done.

In Mahu there is a famous legend regarding his way of study. He was not allowed to sit in the class with other upper class students so he used to ponder in the class through the windouss. At when the finals were class the Brahmin teacher asked his student to recite the tables but none of the educated students who claimed they were better than Bhimrao Ambedkar could recite the tables properly. But Bhimrao Ambedkar not only recite the tables well but also recite. The tables which were studied at much higher classes.

Such incidences were common in the life of this uncommon man. He was granted scholarship from the king of Vadodara. H.H. Gaikwad. The king agreed to not only pay for his education fees but also he would pay allowance till he wanted to pursue education. His CV was consist of the degrees from the world's most prestigious colleges such as Columbia University, London School of Economic Oxford, University of Calcutta and much more. He was a Lawyer, philosophist, economist and also a actiuist working towords the betterment of the backword castes.

He was so reknowned, that he was the minister of Human Labour, before the independence of India. Breitishers considered him as must educated Indian of tha Ninteenith Century. After Independence he wrote the constitution of India, which is considered as most important document of India. He was also responsible for the Dams, which Nehru considered as Modern Temples of India. Also he has a statue at the grand enterance in the university of England.

**- Ku. Swati Chavhan**
**Class : B. Com.- II**



# महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल - २०२५ - २६

महाविद्यालयात कार्यरत सर्व विभागामार्फत सत्र २०२५ - २६ मध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रासेयो शिबीर, गरजूंना फराळ वाटप, पशु पक्षांच्या पाण्याच्या उपलब्धीसाठी मातीचे जलपात्र वाटप, महिला दिनी होतकरू व मेहनत करणाऱ्या महिलांचा सन्मापत्रे देऊन सत्कार, विध्यार्थ्यांच्या विकासासाठी आश्रम भेटी, अनाथालयात वह्या, पेन व डायरीचे वाटप, वन्यजीव सप्ताह, वाचन प्रेरणादिन, फ्लेवर्स ऑफ इंडीया २०२५ ला अभ्यास भेट, एकात्म मानवदर्शन कार्यशाळा, NEP - 2020 Connect Work Shop, रेड रिबन क्लबची स्थापना, सरदार @ १५० अभियान, भाषिक कौशल्ये विकास अंतर्गत कार्यशाळा, अॅन्टी रॅगिंग सप्ताह, हर घर तिरंगा अभियान, स्वच्छता ही सेवा पंधरवडा, विद्यापीठस्तरीय वेटलिफ्टींग स्पर्धेचे आयोजन, मतदान जनजागृती, वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, कृषी प्रदर्शनास अभ्यास भेट, Soft Skill for Personality Development या कार्यशाळेचे आयोजन, औद्योगिक स्थळांना अभ्यास भेट, विविध अभ्यास मंडळाचे गठन व त्याद्वारे कार्यक्रम, ग्रंथ प्रदर्शनी, काव्य चर्चा, जागतिक मराठी भाषा दिनी कार्यक्रम, विविध महापुरुषाच्या जयंती व स्मृतीदिनी अभिवादन व उद्बोधन कार्यक्रम, विध्यापीठाच्या युवा महोत्सवात व आंतर महाविद्यालयीन विविध स्पर्धात सहभाग, मानवी हक्क दिन, आर्थिक साक्षरता उपक्रम, क्रीडा उपक्रमात सहभाग, अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन विध्यार्थ्यांच्या विकासासाठी करण्यात आले.










## वाणिज्य व व्यवस्थापन विभाग वार्षिक अहवाल सत्र -२०२५ - २६

सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागा अंतर्गत सामाजिक, शैक्षणिक व गैर शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले. त्यातील सर्वप्रथम, शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये वाणिज्य अभ्यास मंडळाचे गठन दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले. ऑक्टोबर महिन्यात वाणिज्य अभ्यास मंडळ अंतर्गत प्रकाशोत्सव, दिवाळीच्या निमित्ताने गोरगरीब व गरजूंना दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. तसेच नोव्हेंबर महिन्यात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञानावर भर देण्यासाठी फ्लावोर्स ऑफ इंडिया एक्सपो २०२५ ला भेट देण्यात आली. या अभ्यास मंडळांतर्गत जानेवारी २०२६ महिन्यात विद्यार्थ्यांसाठी सात दिवसीय बँकिंग आणि वित्तीय साक्षरता कार्यक्रम राबविला गेला. फेब्रुवारी २०२६ महिन्यात एसबीआय एटीएम शाखेला भेट व एटीएमची कार्य प्रणाली समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांची भेट देण्यात आली. सोबतच विद्यार्थ्यांना औद्योगिक कार्यप्रणाली जाणून घेण्यासाठी एमआयडीसी फेज चार  मधील मे. श्री बालाजी अग्रो इंडस्ट्रीज येथील कारखान्यात शेतीसाठी लागणाऱ्या ठिबक व  फवारणी पाईप बनवण्याची पद्धती व त्यांच्या करिता उपलब्ध बाजारपेठ व इतर माहिती  विद्यार्थ्यांना समजून घेतले. मार्च २०२६ महिन्यात जागतिक चिमणी दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या परिसरातील नागरिकांना मातीचे जलपात्र वितरित करण्यात आले.


















# मराठी विभाग वार्षिक अहवाल - २०२५ - २६

सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ या वर्षामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास पांडे यांच्या सहकार्याने आणि विभाग प्रमुख डॉ. भास्कर पाटील आणि प्रा. एन. एफ. चव्हाण यांच्या मार्गदर्शनात साहित्य आणि भाषेची अभिरुची वाढविणारे व भाषा समृद्ध करणारे कार्यक्रम राबविण्यात आलेत. मराठी विभागातर्फे दरवर्षीप्रमाणे सत्र २०२५-२०२६ 'या वर्षात देखील मराठी भाषा व वाङ्मय अभ्यास मंडळाचे गठन आणि उद्घाटन दि. १८नोव्हेंबर २०२५ करण्यात आले. यावेळी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून प्रमोदकुमार सोनोने बी.ए.व्दितीय वर्ष आणि इतर पदाधिकारी यांची उपस्थिती होती. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने काव्य वाचन, कथा कथन, बंजारा बोलीचा जागर, लेखन वाचन कौशल्य कार्यशाळा, मराठी शुध्दलेखन कार्यशाळा इ. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अकोल्यातील व-हाडी कथाकार डॉ.एकनाथ खेडकर, डॉ.भास्कर पाटील, प्रा.एन.एफ.चव्हाण, प्रा.मिनाक्षी शिंदे, ज्योती वानखडे यांनी आपल्या कथा - कवितेचे सादरीकरण केले. कवी श्रेष्ठ कुसुमाग्रज यांची जयंती ही महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरी केली जाते, दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन हा कार्यक्रम घेण्यात आला. मराठी भाषा अभ्यास मंडळाच्या वतीने दि. २१/०३/२०२६ रोजी जागतिक काव्यदिना निमित्त मराठी अभ्यास मंडळाच्या विद्यार्थ्यांनी स्वनिर्मित कवितेचे वाचन केले. अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिध्द कवी लोकनाथ यशवंत यांची निवड झाल्याबद्दल मराठी विभागातर्फे भव्य नागरी सत्कार करण्यात आला. मराठी विभागातर्फे भाषिक कौशल्ये विकासांतर्गत दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या सोबतच भारतातील थोर विचारवंताची जयंती, वाचन प्रेरणादिन, वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलनामध्ये सहभाग, घेण्यात आला.











## शारीरिक शिक्षण विभाग वार्षिक अहवाल २०२५ - २६

महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण विभागातर्फे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. नितीन देऊळकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ मध्ये विविध क्रीडा, आरोग्यविषयक व व्यक्तिमत्त्व विकासात्मक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडावृत्ती, शिस्त, संघभावना आणि शारीरिक सुदृढता निर्माण करण्याच्या उद्देशाने विभागाने सातत्याने प्रयत्न केले. विविध खेळांच्या स्पर्धांमध्ये महाविद्यालयाचे संघ पुढीलप्रमाणे सहभागी व्हॉलीबॉल (महिला) धाबेकर कला महाविद्यालय, अकोला टेबल टेनिस (पुरुष) आर. एल. टी. महाविद्यालय, अकोला बुद्धिबळ (पुरुष व महिला) - शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला ॲथलेटिक्स (पुरुष व महिला) डिग्री महाविद्यालय, अमरावती बॉक्सिंग (पुरुष) - संत गजानन महाराज महाविद्यालय, बोरगाव मंजू हँडबॉल (पुरुष) - सरस्वती कला महाविद्यालय, दहीहंडा सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट क्रीडाप्रदर्शन करून महाविद्यालयाचा गौरव वाढविला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महाविद्यालयातील बी. कॉम. भाग-१ चा विद्यार्थी धनंजय खाडे याने ॲथलेटिक्समधील ४०० मीटर धावणे या स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यापीठ स्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त केला. त्याच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत भर पडली. शारीरिक शिक्षण संचालक डॉ. नितीन देऊळकर यांनीही विविध स्तरांवर महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या.








## ग्रंथालय विभाग वार्षिक अहवाल - २०२५ - २६

Library Department: a) Certificates distributed on 15th of August 2025 of Elocution Competition organised on the occasion of Birth Anniversary of Dr. A. P. J. Abdul Kalam held on 15/10/2025. b) Book Exhibition was organised on the occasion of Vaachan Prerna Din c) Books Exhibition was organised on the occasion of Dr. S. R. Ranganathan & Late Shri Sudhakarrao Naik on 21/08/2025. c) Induction Program for newly admitted students organised on17/07/2025.d) Books Exhibition, Essay Competition was organised on the Birth Anniversary of Dr. APJ Abdul Kalam on 15th October 2025 e) Certificate Distributed of Essay Competition on the occasion of Republic Day on 26/01/2026. f) Books Exhibition was organised on the occasion of World Book Day on 23/04/2026 and Library Department, Marathi, NSS,was organised Vachan Sankalp Maharashtra Cha Pandharwada





# राष्ट्रीय सेवा योजना - वार्षिक अहवाल - २०२५ - २६

आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास पांडे आणि रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. एन.एफ.चव्हाण यांच्या मार्गदर्शनात कार्यरत असून, सक्षमपणे रासेयो पथकव्दारे शैक्षणिक सत्र **२०२५ - २६** मध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले. केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या निर्देशानुसार वेळोवेळी आलेल्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार ग्रामपातळी व महाविद्यालयीन स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात आले. नियमित कार्यक्रमासह सत्र **२०२५ - २६** मध्ये ग्राम कुशीनगर (येवता) येथे दि.०६ ते १३ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान रासेयोचे निवासी शिबीर यशस्वीपणे घेण्यात आले. या गावात स्वयंसेवकांनी ग्रामस्थांच्या घाण कचरा समस्येसाठी 'माझा कचरा माझी जबाबदारी' अभियान अंतर्गत स्मशानभूमीचे सौदर्यीकरण करण्यात आले. पडीक जमीन विकास अंतर्गत दत्तकग्राम येवता येथे विविध कामे करण्यात आली.रक्त तपासणी, आरोग्य विषयक मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, महिला सबलीकरण, आपती व्यवस्थापण बौद्धिक सत्रातातून या नियोजित विषयावर मान्यवर अभ्यासकांची समायोचित व्याखाने झाली. स्वच्छता रॅलीचे आयोजन, परिसर स्वच्छता व वृक्षारोपणही करण्यात आले. नियमित कार्यक्रमात हर घर तिरंगा अभियान, राष्ट्रीय पोषण महा, स्वच्छता ही सेवा पंधरवडा, रासेयो दिन - उदबोधन वर्ग, वन्यजिव सप्ताह, राष्ट्रीय एकता दिन,संविधान दिन, विविध बचतगटाना भेट, बालिका दिन,महिला दिन, हुतात्मा दिन, असे महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध कृतिशील उपक्रम रा.से.यो. पथकाव्दारे राबविण्यात आले.


















# इंग्रजी विभाग वार्षिक अहवाल २०२५-२०२६

**In the Academic Session of 2025-26 Department of English Has Conducted The Following Programmes Successfully.**

• Inauguration of language association on 18 th November 2025 • World poetry day was celebrated on 21st March 2024. •National youth day was celebrated on 13th January 2026

• One week workshop on English grammar and Soft Skill Workshop was conducted from 01/03/2026 to 09/03/2026

इंग्रजी व मराठी विभागा तर्फे भाषिक, कौशल्ये विकासांतर्गत दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.







## सांस्कृतिक विभाग वार्षिक अहवाल - २०२५-२०२६

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास पांडे आणि सांस्कृतिक समितीचे समन्वयक प्रा. एन. एफ. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक सत्र **२०२५-२०२६** मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे केशरबाई लाहोटी महाविद्यालय अमरावती येथे आयोजित युवा महोत्सवांमध्ये महाविद्यालयाच्या वतीने वादविवाद, वक्तृत्व, क्विझ, पेंटिंग, कोलाज, मातीकला, रांगोळी, मेंहदी, या स्पर्धांमध्ये दि. **७/१०/२०२५** ते १०/१०/२०२५ रोजी आनंद राठोड, अनिकेत डोंगरे, शिवानी माने, पुनम तांदळे, प्रियंका जामनिक, रुषंग पवार, अभिजीत गावंडे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या सोबतच **अकोला स्थित ज्योती जानोळकर महाविद्यालय** मध्ये आयोजित विविध स्पर्धेपैकी वक्तृत्व स्पर्धेत आनंद राठोड दुसरा, आणि निबंध स्पर्धेत प्रथम तर प्रियंका जामनिक, हिने वक्तृत्व स्पर्धेत तिसरे पारितोषिक प्राप्त केले आणि निबंध स्पर्धेत दुसरे पारितोषिक प्राप्त केले.शिवाय शिक्षक दिनी विद्यार्थ्यांनी स्वतः शिक्षक बनुन अध्यपनाचे कार्य केले.गो.से.महाविद्यालय खामगांव येथे आयोजित राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेत रुषंग पवार व अभिजीत गावंडे यांनी सहभाग घेतला. ' स्वागत नववर्ष २०२६' या कार्यकमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणाचे सादरीकरण केले. विविध अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांनी रांगोळी, पेंटिग, घोषवाक्य, पोस्टर, स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.आणि विविध रॅलीचे आयोजन करुन पथनाट्याचे सादरीकरण केले.









### अर्थशास्त्र विभाग वार्षिक अहवाल २०२५ - २६

अर्थशास्त्र विभागामार्फत दर वर्षी नाविन्यपूर्ण असे कार्यक्रम घेण्यात येत असतात. या वर्षी हि वेगवेगळे असे कार्यक्रम घेण्यात आले. त्याची माहिती या वर्षाच्या वार्षिक अहवालातून होणार आहे. शैक्षणिक वर्ष **२०२५ - २६** मध्ये अर्थशास्त्र विभागामार्फत दर वर्षी अभ्यास दौरा काढण्यात येतो. याही वर्षी अर्थशास्त्र विभागामार्फत कृषी प्रदर्शन व फ्लेवर्स ऑफ इंडिया एक्सपो २०२५ ला भेट देण्यात आली. औधोगिक प्रदर्शनास भेट देण्यात आली. या भेटीमधून विद्यार्थ्यांना शेतीतील व औद्योगिक क्षेत्रातील यंत्र सामुग्रीत बदल होत आहे याची माहिती विद्यार्थ्यांना झाली. तसेच भांडवल कशा प्रकारे उभारावे याची माहिती सुद्धा या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना झाली आहे. देशाच्या आर्थिक विकासासाठी व नैसर्गिक व मानवी कल्याणासाठी व प्रगतीसाठी सरकारला अंदाजपत्रक सादर करावा लागतो. या अंदाजपत्रकात सरकारने कोणकोण त्या बाबींवर किती खर्च केला व किती महसूल प्राप्त केला याची माहिती विद्यार्थ्यांना होण्यासाठी अंदाजपत्रकाचे सादरिकरणाचे प्रेक्षपण विद्यार्थ्यांना दाखविले जाते. तसेच अंदाजपत्रकाचे वाचन करून त्यावर चर्चा सिद्ध घडवून आणल्या जाते व त्यावर आधारित प्रश्न विचारले जातात. दि अकोला जनता कमर्शीयल को-ऑफ. बँकेला व ATM ला भेटीचे मुख्य कारण की, विद्यार्थ्यांना बँकिंग विषय असून सुद्धा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्य बँकिंग कार्य कसे चालते याची माहिती होण्यासाठी हा अभ्यास दौऱ्या अर्थशास्त्र विभागामार्फत दर वर्षी करण्यात येतो.







## इतिहास विभाग वार्षिक अहवाल २०२५-२०२६

**सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयात शैक्षणिक सत्र २०२५- २६ मध्ये इतिहास विभागातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.** दिनांक २१- ८-२०२५ ला **सुधाकररावजी नाईक यांची जयंती** इतिहास विभागातर्फे साजरी करण्यात आली.या कार्यक्रमात सुधाकररावजी नाईक यांच्या जीवनावर संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.जयंत बोबडे यांनी मार्गदर्शन केले. २६/१२/२०२५ रोजी विरबालदिन साजरा करण्यात आला.२० /०२/२०२६ रोजी शिवजंयती निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या शिवाय हुतात्मा दिन रोजी महात्मा गांधी यांचे विचार त्यांचे कार्य या विषयावर प्रमुख वक्ते प्रा.दिपक वाघमारे यांनी मार्गदर्शन केले.






## समाजशास्त्र विभाग वार्षिक अहवाल २०२५ - २६

सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागातर्फे शैक्षणिक सत्र २०२५ - २६ ह्या वर्षात समाजशास्त्र विभागातर्फे वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात आले यामध्ये सर्वप्रथम वर्षाच्या सुरुवातीला समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली आणि वर्ष भरात घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली. जागतिक मानवाधिकार दिवस, गाडगे महाराज जयंती, बालक दिन, सावित्रीबाई फुले जयंती, जागतिक महिला दिन महाविद्यालयात साजरे करण्यात आले. गायत्री बालिकाश्रमास व उत्कर्ष शिशुगृहास भेट देण्यात आली. वर्षभरात विद्यार्थ्यांना समाजसुधारक, विचारवंत यांच्या जयंतीनिमित्त वेगवेगळ्या कार्यक्रमाचे माध्यमातून स्पर्धा, निबंध लेखन, रांगोळी, स्लोगन, रॅली, आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव श्री. बी. पी. पवार, अध्यक्ष डॉ. नितीन पवार, उपाध्यक्ष डॉ. जयंत बोबडे, प्राचार्य डॉ. अंबादास पांडे यांचे मार्गदर्शनात घेण्यात आले.







## राज्यशास्त्र विभाग वार्षिक अहवाल. शैक्षणिक सत्र २०२५ - २६

**१८ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यशास्त्र अभ्यास मंडळ कार्यकारिणी गठित करण्यात आली.**

● विद्यापीठाच्या MOU संकल्पनेनुसार धाबेकर कला महाविद्यालय व सुधाकरराव नाईक कला महाविद्यालय अकोला यांच्यामध्ये शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला.● प्रा.राधा मुरुमकर व प्रा.संदीप कु-हाडे यांचे धाबेकर कला महाविद्यालय येथे **राज्यशास्त्र या विषयावरील व्याख्यान** संपन्न झाले. ● राज्यशास्त्र अभ्यास मंडळांतर्गत २६ नोव्हेंबर या दिवशी **संविधान गौरव दिन** साजरा करण्यात आला.

● राज्यशास्त्र व समाजशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने **मानवी हक्क दिनानिमित्त** १० डिसेंबर रोजी महाविद्यालयामध्ये कार्यक्रम घेण्यात आला आहे.

**●सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन** महाविद्यालयाच्या वतीने साजरा करण्यात आलेला आहे. **●राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त** दि. २४ जानेवारी ला राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान दिनाची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली व **संविधान जनजागृती रॅलीचे** आयोजन करण्यात आले.तसेच १४ एप्रिल ला **डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती** साजरी साजरी करण्यातआली, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने **२०२५ - २६** या शैक्षणिक वर्षात अनेक उपक्रम राबवण्यात आलेले आहेत.

